सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अमरावती महानगरपालिकेत भाजपचा महापौर ठरला; सव्वा-सव्वा वर्षांचा फार्म्युला

### श्रीचंद तेजवानी महाराष्ट्रातील भाजपचे पहिले सिंधी समाजाचे महापौर : ६ फेब्रुवारीला होणार निवडणूक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावती महानगरपालिकेत अखेर सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून महापौर पदावर भारतीय जनता पार्टीचा उमेदवार निश्चित झाला आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट), आमदार रवी राणा यांची युवा स्वाभिमान पार्टी आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या महायुतीतून अमरावती महानगरपालिकेत सत्ता स्थापन होणार आहे. या सत्तावाटपात महापौर पदासाठी सव्वा-सव्वा वर्षांचा फार्म्युला निश्चित करण्यात आला असून सुरुवातीचे अडीच वर्ष भाजपकडे राहणार आहेत.

भाजपच्या आज झालेल्या अंतर्गत बैठकीत महापौर पदाच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानुसार सुरुवातीच्या सव्वा वर्षासाठी भाजपचे नगरसेवक श्रीचंद तेजवानी हे महापौर असतील, तर त्यानंतरच्या सव्वा वर्षात भाजपचेच आशिष अतकरे महापौर पदाची सूत्रे हाती घेणार आहेत. विशेष बाब म्हणजे श्रीचंद तेजवानी हे महाराष्ट्रातील भाजपचे पहिले सिंधी समाजाचे महापौर ठरणार असून अमरावतीच्या राजकारणात हा एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.

महापौर पदाची अधिकृत निवडणूक येत्या ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्याआधीच भारतीय जनता पार्टीने अधिकृतपणे महापौर पदाचे उमेदवार जाहीर करून राजकीय चित्र स्पष्ट केले आहे. महापौरपदासह उपमहापौर, स्थायी समिती सभापती व इतर महत्त्वाच्या पदांचाही सत्तावाटपाचा फार्म्युला महायुतीतील घटक पक्षांमध्ये निश्चित करण्यात आला आहे.

फार्म्युल्यानुसार सुरुवातीचे अडीच वर्ष भाजपकडे महापौर पद राहणार असून उर्वरित अडीच वर्षात युवा स्वाभिमान पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) यांना महापौर पद देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व घटक पक्षांना सत्तेत सहभागी करून घेत संतुलित कारभार करण्याचा प्रयत्न असल्याचे चित्र आहे.

महापौरपदासाठी निवड झालेल्या श्रीचंद तेजवानी यांच्या नावामुळे सिंधी समाजात विशेष उत्साहाचे वातावरण असून भाजपने समाजाला प्रतिनिधित्वाची संधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. दुसरीकडे, महायुतीच्या माध्यमातून शहराचा विकास, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि वाहतूक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले जाईल, असा दावा नेत्यांकडून केला जात आहे.

६ फेब्रुवारीच्या निवडणुकीनंतर अमरावती महानगरपालिकेत नवे नेतृत्व अधिकृतपणे सत्तेवर येणार असून आगामी पाच वर्षांच्या कारभाराकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## शिवसेनेचा गटनेता ठरला, एकनाथ शिंदेंकडून अमेय घोले या नगरसेवकाला संधी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाची निवडणूक आता जवळ येऊन ठेपल्याने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मुंबईतील २९ नगरसेवकांची आज गट नोंदणी केली जाणार आहे. तत्पूर्वी शिंदे गटाकडून मुंबई महानगरपालिकेतील गटनेते पदासाठी अमेय घोले यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे. शिवसेनेतील तरुण आणि अभ्यासू नगरसेवक अशी अमेय घोले यांची ओळख आहे. गेल्या तीन टर्मपासून ते नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना महानगरपालिकेतील कामकाजाचा चांगला अनुभव आहे. याशिवाय, अमेय घोले हे एकनाथ शिंदे यांच्या विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक म्हणून ओळखले जातात. यामुळेच शिवसेनेच्या गटनेतेपदासाठी अमेय घोले यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे समजते.

## पवार कुटुंबातच राष्ट्रवादीचं अध्यक्षपद राहावं, महायुतीतील नेत्यांची भूमिका, सुनेत्रा पवारांना पसंती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर पत्नी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून होत आहे. असं असताना आता राष्ट्रवादी पक्षातूनच नवी माहिती समोर आली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे नेतृत्व कुणी करायचं याला सर्वाधिक प्राथमिकता असल्याचं सांगण्यात येत आहे. आधी पक्षाचं नेतृत्व मग उपमुख्यमंत्रिपद असा प्राधान्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्रीपदाचा निर्णय मागे-पुढे होऊ शकतो.

**सुनेत्रा पवारांनाच अध्यक्ष करा**

दरम्यान, अजित पवार हे त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्याकडेच अध्यक्षपद देण्यात यावं अशी एक भूमिका राष्ट्रवादीतील काही नेत्यांची आहे. पक्ष अजित पवारांचा, त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षपद पवार कुटुंबाकडेच राहावं असा एक मतप्रवाह आहे. अजित पवारांसारख्याच सुनेत्रा पवारही राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री दोन्ही होऊ शकतात अशी नेत्यांची भूमिका आहे.

**प्रफुल पटेलांचं नावही चर्चेत**

दुसरीकडे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांचं नावही अध्यक्षपदासाठी चर्चेत आहे. असं असलं तरी त्यांच्या नावापेक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडेच अध्यक्षपद सोपवण्याकडे कल आहे. त्यातच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची प्रक्रिया सुरु असताना, ही प्रक्रियाही त्याचवेळी होते का याकडेही सर्वांचं लक्ष आहे. आज किंवा उद्या राष्ट्रवादीचे नेते बारामतीत अजित पवारांच्या रक्षाविसर्जन कार्यक्रमानंतर पवार परिवाराला भेटून याबद्दल चर्चा करू शकतात.

## मशाल चिन्ह दिसलं की निधी कमी करून टाकतो

### मंत्री नितेश राणे यांचे ठाकरेंना डिवचणारे विधान




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२रत्नागिरी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. याच प्रचारादरम्यान कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी एक विधान केले. कमळ किंवा धनुष्यबाण चिन्ह दिसले की, लगेच निधी देतो. पण, चुकून मशाल चिन्ह निघाले की, असलेला निधीही कमी करून टाकतो, असे नितेश राणे म्हणाले आहेत. कणकवलीमधील फोंडा जिल्हा परिषद मतदारसंघात प्रचार करताना त्यांनी हे विधान केले.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी झालेल्या प्रचारसभेत बोलताना नितेश राणे म्हणाले, चिन्ह बघून निधी देतो. कमळ आणि धनुष्यबाण आमची चिन्हे आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीतही सगळ्या सरपंचांना सांगितले होते की, आम्हाला ग्रामपंचायत द्या, नाहीतर एक रुपयाचाही निधी मिळणार नाही. त्यामुळे सगळे सरपंच पटापट आमचे झाले.

नितेश राणे म्हणाले, विरोधी उमेदवारांना मतदान का करायचं? असा प्रश्न लोकांना पडला आहे. ही निवडणूक खासदार नारायण राणे यांच्या नेतृत्वाखाली लढवत आहोत. गेली २७ वर्षे जिल्हा परिषद त्यांच्या नेतृत्वाखाली आहे आणि पुढील पाच वर्षेही राहील. जिल्ह्याचा विकास खासदार नारायण राणे आणि महायुतीच करू शकते, असा दावा नितेश राणे यांनी केला.

उबाठाची आम्हाला कोणतीही चिंता नाही. जे काही उमेदवार उरले आहेत, ते प्रचार करताना दिसत नाहीत. काही तर लपत फिरत आहेत. निवडणुकीनंतर पुन्हा निधीसाठी आमच्याकडेच यावे लागणार आहे, नितेश राणे यांनी म्हटले आहे.

## कोणत्याही अडचणीत मी तुमच्या सोबत आहे

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलं जाधव कुटुंबीयांचं सांत्वन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२सातारा**

गेल्या आठवड्यात बुधवारी, २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ झालेल्या एका भीषण विमान अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. यामध्ये अजित पवार यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव यांचाही समावेश होता. दरम्यान, या दुःखद घटनेनंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी वैयक्तिक दुःख बाजूला ठेवत आज विदीप जाधव यांच्या फलटण तालुक्यातील तरडगाव येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी स्वर्गीय विदीप जाधव यांच्या पत्नी आणि मुलांच्या डोक्यावर मायेने हात फिरवत 'कोणत्याही अडचणीत मी तुमच्या सोबत आहे' असा धीराचा शब्द देत सुनेत्रा पवार यांनी कुटुंबीयांना आधार दिला. या भावनिक प्रसंगामुळे उपस्थितांचेही डोळे पाणावले.

दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर शनिवारी राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणाऱ्या सुनेत्रा पवार ह्या शपथविधीनंतर बारामती येथे परतल्या होत्या. त्यानंतर आज सुनेत्रा पवार यांनी कराड येथील प्रिती संगम येथे जाऊन महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहिली.

## राष्ट्रवादीचे नेते बोलायचं टाळत असताना हसन मुश्रीफांचा मोठा दावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर आता दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्रिकरणाबाबत अनेक चर्चा, बैठका झाल्याचे दावे होताना दिसत आहेत. अशातच मुंबई राष्ट्रवादीच्या दोन गटांमध्ये विलीनीकरणाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत काही बैठका झाल्या होत्या. त्यात नेमका कोणता फॉर्म्युला ठरला होता किंवा कोणत्या पर्यायांवर चर्चा झाली? विलीनीकरणानंतर शरद पवार हे भाजपसोबत सत्तेत गेले असते की अजित पवार सरकारमधून बाहेर पडले असते, असे अनेक प्रश्न आता राजकीय वर्तुळात रंगले आहेत. तर दुसरीकडे अजित पवारांच्या पक्षातील नेत्यांनी यावरती भाष्य करणं टाळल्याचं दिसून आलं आहे, त्यानंतर आता अजित पवारांच्या पक्षाचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफांनी मोठा दावा केला आहे. 'दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणासाठी जयंत पाटील माझ्यासाठी बोलले होते, पण आम्हाला घेऊन कोणत्याही बैठका झाल्या नसल्याचं हसन मुश्रीफांनी म्हटलं आहे.

**जे पोटात ते ओठात असं त्यांचं मन होतं**

दादा किती मोठे होते, त्यांचा विकासामध्ये किती मोठा वाटा होता, हे सर्वांना माहिती आहे. अजितदादांनंतर आता आम्ही पोरके झाले आहोत. त्यांनी कधी खोटं बोलण्याचा प्रयत्न केला नाही. जे पोटात ते ओठात असं त्यांचं मन होतं. दिलेला शब्द पाळणारा आणि कायमच सर्वांना न्याय देणार आमचा नेता होता. त्यांच्या जाण्यानं आम्ही पोरके झालो आहेत. राज्यासाठी, कार्यकर्त्यांसाठी सुनेत्रा वहिनींनी त्यांचं दुःख बाजूला ठेवून त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे, असंही मुश्रीफ म्हणालेत.

## १९ वर्षीय वेदमूर्ती देवव्रत रेखेंकडून दंडक्रम पारायण पूर्ण

### उद्याला कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठात होणार विशेष सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अहिल्यानगर**

अहिल्यानगर येथील १९ वर्षीय वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांनी यजुर्वेदाचे दंडक्रम पारायण यशस्वीरीत्या पूर्ण करून वैदिक परंपरेत एक महत्त्वाचा अध्याय जोडला आहे. त्यांच्या या अद्वितीय साधनेबद्दल आज, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.



दंडक्रम पारायण हा वैदिक पठणाचा अत्यंत कठीण आणि दुर्मीळ प्रकार मानला जातो. गेल्या सुमारे २०० वर्षांत या पद्धतीने पारायण झाल्याची नोंद आढळत नाही, ज्यामुळे देवव्रत रेखे यांची ही उपलब्धी वैदिक परंपरेतील एक अभूतपूर्व घटना ठरली आहे.

हा सत्कार समारंभ आज सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या तोतडे सभागृहात संपन्न होईल. कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता प्रो. हरेकृष्ण अगस्ती यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली याचे नियोजन करण्यात आले आहे.

या प्रसंगी वेदमूर्ती देवव्रत रेखे स्वतः दंडक्रम पारायणाचे प्रात्यक्षिक सादर करणार आहेत. यामुळे उपस्थितांना या दुर्मीळ वैदिक पठणाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमाला नागपूरचे प्रख्यात वेदविद्वान् कृष्णशास्त्री आर्वीकर, देवव्रतचे गुरु आणि वडील महेश रेखे, तसेच माहूरगडचे वेदमूर्ती निलेश केदार उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे भूषण ठरलेल्या या युवा वेदमूर्तींच्या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहून या ऐतिहासिक आणि अभूतपूर्व वैदिक कार्यक्रमाचे साक्षीदार होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने प्रो. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले आहे.


## अमरावती महापालिकेत बायो-मायनिंगचा १३ कोटींचा कंत्राट वादग्रस्त कंपनीला?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनासाठी गत २१ दिवसांपूर्वी राबविलेल्या बायो-मायनिंग कंत्राट प्रक्रियेत एका वादग्रस्त कंपनीची निवड केली आहे. या कंपनीने बिहारच्या गया, पाटणा येथे एसएफएलएसची कामे केली असून बायो-मायनिंग कामाचे अनुभव नाही. तसेच बिहारच्या 'कॅग' ऑडिट अहवालात या कंपनीवर ताशेरे ओढण्यात आले आहे. असे असताना महापालिका प्रशासनाने कशाच्या आधारे नॅकॉफ इंडिया प्रा. लि. ची निवड करून १३ कोटींचा कंत्राट सोपविण्याचा निर्णय घेतला, हा संशोधनाचा विषय ठरत आहे.

मनपाने बायो-मायनिंग कंत्राटाची निविदा प्रक्रिया १० जानेवारी २०२६ रोजी जारी केली होती. यात भोपाळ येथील नॅकॉफ इंडिया प्रा. लि., शिवप्रसाद बांदल एलएलपी पुणे, आरकेएफ पुणे आणि आरएनपी इन्फ्रा मुंबई अशा चार कंपनीनी सहभाग घेतला होता. मात्र, निविदा उघडल्यानंतर तांत्रिक कारणे पुढे करून दोन कंपन्यांना यातून प्रशासनाने अपात्र ठरविले. केवळ नॅकॉफ इंडिया प्रा. लि. आणि आरकेएफ पुणे या दोन कंपन्यामध्ये स्पर्धा झाली. अखेर पुणे येथील पीएमसीच्या अहवालानुसार नॅकॉफ इंडिया प्रा. लि. या कंपनीला बायो-मायनिंगची कामे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, बायो-मायनिंगची 'नॅकॉफ 'कडे सोपविण्याचा निर्णय हा पर्यावरणाला धोका आणि महापालिकेला आर्थिक नुकसान पोहोचविणारा ठरेल, अशी तक्रार येथील गणेश अनासाने यांनी केली आहे.

राज्याच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यासह महापालिका आयुक्त, शहर अभियंता यांच्याकडे ३० जानेवारी २०२६ रोजी ती तक्रार करण्यात आली आहे. त्यावर महापालिकेला उत्तर देखील मागविण्यात येणार आहे.



बायोमायनिंग कंत्राटप्रकरणी गणेश अनासाने यांची तक्रार प्राप्त झाली आहे. याविषयी प्रशासनस्तरावर चौकशी करून नियमानुसार योग्य ते उत्तर दिले जाईल. निविदा प्रक्रियेतूनच कंत्राटदार संस्था पात्र ठरविण्यात आली आहे.

**– रवींद्र पवार**

**कॅग ऑडिटमध्ये गंभीर ताशेरे तरीही निर्णय घेतला**

बिहारच्या गया, पाटणा येथे नॅकॉफ इंडिया प्रा. लि.ने यापूर्वी केलेल्या एसएफएलएसच्या कामावर कॅगने ऑडिटमध्ये गंभीर ताशेरे ओढले आहे. यात आर्थिक आणि पर्यावरण धोक्यात आणल्याचा ठपका ठेवला आहे. तरीही महापालिका प्रशासनाने या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून बायो-मायनिंग/लीगेसी वेस्ट रेमेडिएशनची कामे सोपविण्याचा घेतलेला निर्णय हा दूरगामी परिणाम करणारा ठरेल, असे तक्रारीत म्हटले आहे.

**'नॅकॉफ' कंपनी कुणाची ?**

भोपाळ येथील नॅकॉफ इंडिया प्रा. लि. ही कंपनी एका राजकीय पक्षाच्या विदर्भ'संघटन' प्रमुखाच्या मुलाच्या नावे आहे. बायो-मायनिंगच्या कामाचा कोणताही अनुभव नसताना थेट कामे सोपविण्यासाठी प्रशासनावर दवाबतंत्र आल्याची चर्चा अलीकडे महापालिका वर्तुळात होत आहे. बायो-मायनिंग कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडले नसताना महापालिका प्रशासनाने नॅकॉफ इंडिया प्रा. लि. कडे कामे सोपविण्याचा निर्णय घेतला, यातच सारेकाही दडले असल्याचे बोलले जात आहे. भोपाळ महापालिकेने ३.५० कोटी प्रकरणी 'नॅकॉफ'ला काळ्या यादीत टाकले आहे.

**हा गंभीर विषय सभागृहात गाजण्याची शक्यता**

अमरावती महापालिका प्रशासनाने नियमावली गुंडाळून भोपाळ येथील 'नॅकॉफ'ला बायो-मायनिंगची कामे सोपविण्याचा घेतलेला निर्णय हा येत्या काळात सर्वसाधारण सभेत गाजण्याची दाट शक्यता आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांची विशेष सभा ६ फेब्रुवारी रोजी होणार असून त्यानंतर आमसभा होईल. मात्र, काहीही झाले तर सर्वसाधारण सभेत 'डोअर टू डोअर कचरा संकलन' ते कचरा डेपो' आणि 'बायो-मायनिंग'हे दोन्ही कंत्राट वादग्रस्त ठरणारे आहे. अद्यापही 'नॅकॉफ' सोबत बायो-मायनिंगचे काम देण्याचा करार झाला नाही, हे विशेष.

## संपादकीय ......

# विकसित भारताचे लक्ष्य

*जागतिक व्यापारातील जोखीम आणि अस्थिरतेचे ग्रहण हे आगामी दशकभरासाठी तरी कायम राहील. या सावटाखालीच देशाची पुढील वाटचाल राहण्याचे संकेत देतानाच या उलथापालथीच्या काळात लांब पल्ल्याची मॅरेथॉन आणि वेगवान धाव असलेली शर्यत भारताला एकाच वेळी जिंकायची असल्याचे मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालात व्यक्त केले होते. अत्यंत अनिश्चिततेच्या काळात ही दुहेरी शर्यत जिंकण्याच्या दृष्टीने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी अनेक पावले टाकली. अर्थसंकल्प लोकप्रिय न करता तो लोककेंद्री कसा राहील, याची दक्षता त्यात घेतलेली दिसते. त्यामुळे त्याचे थेट परिणाम व्यक्तीच्या खिशावर झाल्याचे दिसणार नाही; मात्र अर्थव्यवस्थेवर त्याचे दीर्घकालीन परिणाम दिसावेत, यासाठीच्या ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांचा डोस अर्थव्यवस्थेला देण्याचे भान दाखवलेले दिसते. आर्थिक विकासाला गती, उत्पादकतावाढ, नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करणे, त्यासाठी क्षमतावाढ आणि 'सबका साथ सबका विकास' तत्त्वावर आधारित संसाधने, संधीची निर्मिती यावर भर देण्यात आला आहे.*

*अर्थमंत्र्यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच याबद्दलची स्पष्टता दिली. करदात्यांसाठी नवीन काही तरतुदींची अपेक्षा यावेळी नव्हती. त्यामुळे जुन्या तरतुदी अपेक्षेप्रमाणे कायम ठेवण्यात आल्या; मात्र मूळ रिटर्न भरण्यासाठी पगारदारांसाठीची मुदत ३१ जुलै, तर नॉनऑडिट बिझनेस आणि ट्रस्ट यांच्यासाठी ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत ठरवण्यात आली. नवीन प्राप्तिकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होत असून, यामुळे कर प्रणाली सोपीदेखील होणार आहे. परदेश प्रवासही स्वस्त होणार असून, पर्यटकांवरचा करबोजा लक्षणीयरीत्या कमी होईल. चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के असून, आगामी आर्थिक वर्षात ही तूट ४.३ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. या तुटीचे प्रमाण टप्प्याटप्प्याने घटवण्यात येत असून, त्यावरून वित्तीय शिस्तीचे पालन केले जात आहे, या बदलाची नोंद घ्यावी लागेल. आर्थिक विकासाला गती, तो दीर्घकालीन स्वरूपात टिकवण्याकरिता स्पर्धात्मकता वाढवणे आणि अस्थिर जागतिक घडामोडी लक्षात घेऊन अर्थव्यवस्थेची लवचिकता मजबूत करणे, या तीन कर्तव्यांवर अर्थमंत्र्यांनी लक्ष केंद्रित केले. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या 'ग्रोथ फंडा'साठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) जोखीम भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी या निधीत २ हजार कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद आहे. शिवाय केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांना 'एमएसएमई'कडून माल खरेदीसाठी ट्रेड रिसिव्हेबल डिस्काऊंटिंग सिस्टीम प्लॅटफॉर्म अनिवार्य करण्यात आला. त्यामुळे या उद्योगांची तरलता वाढेल. त्याव्यतिरिक्त २०० जुन्या औद्योगिक संकुलांचे नवनवे तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या मदतीने पुनरुज्जीवन करण्यात येईल.*

*'एमएसएमई' क्षेत्राने ११ कोटी लोकांना रोजगार दिलेला आहे. त्यासाठी भरीव तरतूद करण्यामागे रोजगारनिर्मितीचा मुख्य हेतू आहे. मागील वर्षी संरक्षणावर ६ लाख ८१ हजार कोटी रुपयांची तरतूद होती. यंदा ती ७ लाख ८० हजार कोटींची केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत त्यात १५ टक्के वाढ आहे. त्यातही शस्त्रास्त्रांच्या आधुनिकीकरणासाठीची तरतूद ४० हजार कोटी रुपयांनी वाढवली आहे. मागील दशकापासून केंद्र सरकारचा पायाभूत सुविधांवर भर राहिला. आता पूर्वेकडील दानपुनी ते पश्चिमेकडील सुरतपर्यंत 'डेडिकेटेड फेट कॉरिडॉर' उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे माल वाहतुकीचा वेग वाढू शकेल. पाच लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमधील पायाभूत सुविधांवर लक्ष देण्यात येणार असून, त्यामुळे लहान शहरांचा विकास होईल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बंगळूर, दिल्ली-वाराणसी यासह एकूण सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर प्रकल्प सुरू करण्याची घोषणा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यामुळे मोठ्या शहरांतर्गत वाहतूक गतिमान होणार आहे. देशाला चिपनिर्मितीचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन २' सुरू करण्यासाठी ४० हजार कोटींची भरीव तरतूद केली आहे. पुढील दशकाच्या आरंभापर्यंत जगाला दहा लाखांहून अधिक सेमीकंडक्टर व्यावसायिकांची कमतरता भासणार आहे. भारत या आव्हानात्मक गरजेचे रूपांतर संधीत करू शकतो. आज जगातील 'ग्लोबल डिजाईन वर्क फोर्स'पैकी २० टक्के हिस्सा भारताचा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.*

*अर्थसंकल्पात फ्युचर्स अँड ऑप्शन्स व्यवहारांवरील सिक्युरिटीज ट्रँझॅक्शन टॅक्स वाढवण्यात आला. त्यामुळे सेन्सेक्स कोसळून शेअर बाजारात हाहाकार माजला. अर्थात, त्याने एकूण अर्थसंकल्पाचे मोजमाप होऊ शकत नाही किंवा करता येणार नाही. ओडिशा, केरळ, आंध आणि तामिळनाडूमध्ये दुर्मीळ खनिजांच्या उत्पादनासाठी विशेष कॉरिडॉर निर्माण केला जाणार आहे. दुर्मीळ खनिजांच्या साठ्यांबाबत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे; परंतु त्यांच्या उत्पादनातील देशाचा वाटा एक टक्कादेखील नाही. प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी वसतिगृह उभारण्याची योजना घोषित केल्याबद्दल देशातील असंख्य लाडक्या लेकी निर्मला सीतारामन यांना दुवाच देतील. शिक्षण वा नोकरीसाठी असंख्य तरुण महिला गाव सोडून शहरात येतात. खासकरून दलित व मागासांसाठी वसतिगृहांची गरज प्रचंड आहे. सोळाव्या वित्त आयोगाचा अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला असून, राज्यांचा वाटा ४१ टक्के इतका कायम ठेवला आहे. त्यात महाराष्ट्राचा हिस्सा ६.४४ टक्के असून, या परिणामी सुमारे ९८ हजार कोटी रुपये महाराष्ट्राला मिळणार आहेत. यामधून मेट्रो, ग्रामीण रस्ते, आर्थिक संकुले, ग्रो बिझनेस नेटवर्क अशा अनेक गोष्टींसाठी निधी मिळेल. अद्यापही देशाच्या विकासाची गती वाढून ती ८ टक्क्यांवर जाणे आवश्यक आहे. भांडवली खर्चातील १२.२ लाख कोटींची वाढ उल्लेखनीय म्हणावी लागेल. सीतारामन यांनी सलग नववा अर्थसंकल्प सादर करून एक नवा विक्रमच केला, हे खरे! पंतप्रधानांचे विकसित भारताचे व्हिजन लक्षात घेऊन त्यानुसार निर्धारपूर्वक पावले टाकली जात आहेत. हा अर्थसंकल्प नव्या जगाचे भान ठेवत, अर्थव्यवस्थेत नव्या आशा जागवताना नवी उमेद देण्याचा प्रयत्न करताना दिसतो.*

# अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठा लाभ



केंद्रीय अर्थसंकल्प वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असा असून महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिक शिस्तीचा असून महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कर हस्तांतरणाच्या नव्या सूत्रामुळे केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मिळणाऱ्या निधीत यंदा जवळपास १५ ते २० हजार कोटींची वाढ होणार असून एकूण ९८ हजार ३०६ कोटींचा निधी राज्याला मिळणार आहे. तर पायाभूत प्रकल्पांसाठी एकट्या मुंबई महानगर क्षेत्रातच साडेबारा हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय विविध योजनांमधून महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त निधी मिळणार आहे.

महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. विरोधक मात्र नेहमीप्रमाणे 'महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही', अशी टीका सुरू करतात. अर्थसंकल्पाचा सविस्तर तपशील आल्यावर महाराष्ट्राला काय काय मिळाले ते सविस्तर मांडूच. मात्र, प्रथमदर्शनी असे दिसते की, निव्वळ कर उत्पन्नाचा वाटा म्हणून महाराष्ट्राला ९८ हजार ३०६ कोटी मिळणार आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २० हजार कोटींची वाढ असून दरवर्षी हा निधी वाढतच जाणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील प्रकल्पांचा विचार केला तरी आतापर्यंत साडेबारा हजार कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर झालेला आहे. याशिवाय राज्यभरातील इतर प्रकल्पांसाठीही मोठ्या प्रमाणावर तरतुदी करण्यात आल्या आहेत. संपूर्ण अर्थसंकल्प पुढे येईल तेव्हा ही रक्कम आणखी वाढलेली दिसेल. एकूणच हा अर्थसंकल्प वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असा असून महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पातून विविध क्षेत्रांना पुढील काही वर्षांसाठी दिशा, गती आणि आवश्यक निधी देण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो. विशेषतः वाढत्या शहरीकरणाला नियोजनबद्ध केले जाणार आहे. पाच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व शहरांचा एकात्मिक विचार या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती हे या अर्थसंकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सात वेगवेगळ्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक सवलती देऊन गुंतवणुकीला चालना दिली जाणार आहे. महाराष्ट्राला याचा मोठा लाभ मिळेल. पायाभूत सुविधा क्षेत्रात केंद्र सरकार यावर्षी तब्बल १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.दहा वर्षांपूर्वी दरवर्षी केवळ एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत असताना, आज एका वर्षात १२ लाख कोटींची गुंतवणूक होणे हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. शेती, पशुपालन, मत्स्य व्यवसाय आणि सिंचन या चार क्षेत्रांसाठी भरघोस तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रत्येक ग्रोथ हबला पाच हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत.

महाराष्ट्रात आधीच एमएमआर, पुणे आणि नागपूर असे तीन ग्रोथ हब्स तयार असल्याने राज्याला याचा मोठा लाभ होईल. उद्योगांसाठीच्या विविध कॉरिडॉर्समुळे महाराष्ट्राला विशेष फायदा होणार आहे. मुंबई-पुणे हायस्पीड कॉरिडॉरची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल. एकूणच या अर्थसंकल्पातील तरतुदी महाराष्ट्राच्या औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अत्यंत पूरक असून राज्याला भविष्यातील विकासाच्या आघाडीवर नेणाऱ्या ठरणार आहे.


जर आपण संपूर्ण अर्थसंकल्पाकडे पाहिले, तर भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे प्रतिबिंब यात स्पष्टपणे दिसून येते. ७ टक्क्यांचा विकास दर राखत भारत पुन्हा एकदा जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरलेला आहे. हे सर्व साध्य करत असतानाच वित्तीय तूट साडेचार टक्क्यांच्या आत आणण्यात अर्थमंत्र्यांना यश मिळाले आहे. कोव्हिड काळात वाढलेली तूट टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे आश्वासन अर्थमंत्र्यांनी दिले होते. ते आश्वासन प्रत्यक्षात आणत पूर्ण केलेले आहे. 'डेट-टू-जीडीपी'च्या प्रमाणातही लक्षणीय सुधारणा झाली असून तो हळूहळू ५० टक्क्यांच्या दिशेने वाटचाल करत आहे. हे एका सुदृढ अर्थव्यवस्थेचे लक्षण मानले जाते. एकूणच आर्थिक शिस्त, विकासाचा वेग आणि दीर्घकालीन स्थैर्य या तिन्ही बाबींचा समतोल साधणारा हा अर्थसंकल्प आहे. पुढील काळात सर्व राज्यांना विकासाची संधी मिळेल, अशा प्रकारच्या तरतुदी यात करण्यात आल्या आहेत.

कर प्रणालीकडे पाहिल्यास सामान्य नागरिकांसाठीचे अनावश्यक 'कंप्लायन्स' मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आले आहेत. व्यावसायांवरील 'कंप्लायन्स' ही सुलभ करण्यात आले असून छोट्या चुकांवर थेट शिक्षा अथवा दंड लावण्याऐवजी त्या दुरुस्त करण्याची संधी देण्याचा दृष्टिकोन स्वीकारण्यात आली आहे. कर्करोगासह काही गंभीर आणि अत्यावश्यक आजारांवरील औषधांवरील आयात शुल्क रद्द केल्यामुळे रुग्णांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. कर सुधारणांची प्रक्रिया अधिक व्यवस्थित आणि वास्तववादी पद्धतीने या अर्थसंकल्पात मांडण्यात आली आहे. दरवर्षी कर रचनेत बदल होणे अपेक्षित नसते. मागील काही वर्षांत कर रचनेत मोठे बदल झाले, करदात्यांना दिलासा देण्यात आला. यावर्षी भर हा मुख्यतः 'रॅशनलायझेशन'वर देण्यात आला आहे.लोकांना अधिक सवलती अपेक्षित असणे साहजिक आहे. मात्र, मागील बजेटमध्ये दिलेल्या मोठ्या सवलतीनंतर यंदा व्यवस्था अधिक स्थिर आणि व्यवहार्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकूणच, हा अर्थसंकल्प वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असा असून, महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

**देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य**

# कमी गुंतवणुकीत जास्त नफा देणारी परदेशी भाजीपाला शेती; जाणून घ्या सविस्तर

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**




परदेशी भाजीपाला म्हणजे काय? तर मूळ बाहेरील देशांतून आलेल्या व आधुनिक शेतीत लागवड केल्या जाणाऱ्या भाजीपाला पिकांना परदेशी भाजीपाला असे म्हणतात. या भाज्यांचा उगम युरोप, अमेरिका, चीन, जपान इत्यादी देशांमध्ये झाला आहे.हॉटेल, रेस्टॉरंट, सुपर मार्केट व निर्यात बाजारात या भाजीपाला पिकांना सध्या जास्त मागणी आहे. पोषणमूल्ये, चव व आकर्षक दिसणे ही या भाजीपाला पिकांची वैशिष्ट्ये आहेत. ज्यामुळे बाजार दर देखील तेजीत दिसून येतात.

बहुतेक परदेशी भाजीपाल्याचे उत्पादन प्रामुख्याने पॉलीहाऊस, शेडनेट किंवा नियंत्रित वातावरणात घेतले जाते. योग्य व्यवस्थापन केल्यास या पिकांतून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उत्पन्न मिळू शकते.

परदेशी भाजीपाल्याची ही आहेत नावे

ब्रोकली, लेट्यूस, झुकीनी, सेलेरी, पार्सले, चेरी टोमॅटो, बेल पेपर (रंगीत ढोबळी मिरची), बसेल्स स्प्राऊट, आइसबर्ग लेट्यूस इत्यादी.

परदेशी भाजीपाला शेती कशामुळे फायदेशीर ?

उच्च बाजारभाव व मागणी : ब्रोकली, लेट्यूस, झुकिनी, रंगीत ढोबळी मिरची यांसारख्या परदेशी भाज्यांना हॉटेल, मॉल व निर्यात बाजारात चांगला दर मिळतो.

कमी क्षेत्रात जास्त उत्पन्न : संरक्षित शेती व मातीविना शेती तंत्रज्ञानामुळे कमी जागेत जास्त उत्पादन घेता येते.

संपूर्ण वर्षभर उत्पादनाची संधी : पॉलीहाऊस/नेटहाऊसमुळे हंगामावर अवलंबून न राहता वर्षभर पीक घेता येते.

थेट विक्री व करार शेतीची शक्यता : सुपरमार्केट, रेस्टॉरंट व निर्यातदारांशी थेट करार केल्याने मध्यस्थांचा खर्च कमी होतो.

या शेतीतून किती मिळणार उत्पन्न ?

ओपन फिल्ड लागवड (एक एकर) : परदेशी भाज्यांपासून अंदाजे २ ते ३ लाख/एकर/हंगाम उत्पन्न मिळू शकते.

नेटहाऊस/शेडनेट शेती (एक एकर) : नियंत्रित वातावरणामुळे उत्पन्नात वाढ होतो परिणामी ४ ते ५ लाख/एकर/हंगाम उत्पन्नाची शक्यता.

पॉलीहाऊस शेती (एक एकर) : उच्च दर्जा व वर्षभर उत्पादनामुळे ७ ते ८ लाख/एकर/वर्ष उत्पन्न मिळू शकते.

हायड्रोपोनिक्स/मातीविना शेती (एक एकर) : लेट्यूस, सेलेरी, मायक्रोग्रीन्ससाठी १० ते १२ लाख/एकर/वर्ष पर्यंत उत्पन्न शक्य.

थेट विक्री व करार शेती असल्यास : हॉटेल, मॉल, निर्यातदार यांना थेट विक्रीमुळे उत्पन्नात २०-३०% वाढ होऊ शकते.

(आकडेवारी सरासरी करून घेतलेली असून पीक निवड, व्यवस्थापन, बाजारभाव व तंत्रज्ञानवर अवलंबून प्रत्यक्ष उत्पन्न कमी-जास्त होऊ शकते.)

या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रामुख्याने वापर

संरक्षित शेती तंत्रज्ञान : पॉलीहाऊस, नेटहाऊस, शेडनेट यामध्ये तापमान, आर्द्रता व प्रकाश नियंत्रित करून उच्च दर्जाचे उत्पादन घेतले जाते.

मातीविना शेती : कोकोपीट, परलाइट किंवा न्यूट्रिएंट सोल्युशन वापरून लेट्यूस, ब्रोकली, सेलेरी, झुकिनी यांसारख्या परदेशी भाज्यांचे उत्पादन.

ड्रिप सिंचन व फर्टिगेशन प्रणाली : पाणी व पाण्यात विरघळणारी खते थेट मुळांजवळ देऊन खतांची बचत व उत्पादन वाढ.

उच्च प्रतीचे संकरित /आयात बियाणे : रोगप्रतिकारक, जास्त उत्पादन देणाऱ्या आणि निर्यातक्षम गुणवत्तेच्या जातींचा वापर.

एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन : जैविक कीटकनाशके, स्टिकी ट्रॅप, फेरोमोन ट्रॅप व मर्यादित रासायनिक फवारणीचा समतोल वापर.

काढणीनंतरचे व्यवस्थापन व कोल्ड चेन तंत्रज्ञान : काढणीनंतर ग्रेडिंग, पेंकिंग, प्री-कूलिंग व थंड साठवणूक करून दर्जा व बाजारभाव टिकवणे.

**यशवंत जगदाळे**
**विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, बारामती.**

# फक्त 'हे' पदार्थ खाणं बंद करा, २ आठवड्यात वजन घटून दिसू लागाल स्लिम

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

वजन वाढण्यामागचं सगळ्यात प्रमुख कारण म्हणजे चुकीचा आहार. जर आहारात तुम्ही योग्य ते बदल केले आणि काही पदार्थ खाणं पूर्णपणे टाळलं तर नक्कीच वजन कमी होऊ शकतं..



त्यापैकी पहिला पदार्थ आहे चिप्स किंवा तसेच बाजारात मिळणारे काही पॅकफूड. या पदार्थांमध्ये खूप जास्त मीठ असतं. हे मीठ शरीरात पाणी धरून ठेवतं आणि त्यामुळे शरीरावर सूज येऊन वजन वाढतं.




दुसरा पदार्थ आहे बिस्किटं. अनेकांच्या दिवसाची सुरुवातच बिस्किटे खाऊन होते. ते अतिशय चुकीचं आहे. बिस्किटांमध्ये मैदा आणि साखर यांचं प्रमाण खूप जास्त असतं. पोटाचा घेर वाढविण्यासाठी बिस्किटं खूप जबाबदार आहेत.

बाजारात मिळणारे एनर्जी ड्रिंक किंवा पॅक सरबतं देखील अजिबात आरोग्यदायी नाहीत. त्यांच्यामध्ये खूप जास्त शुगर असते. त्यामुळे अगदी थोडा ज्यूस प्यायला तरी त्यातून भरपूर कॅलरीज पोटात जातात आणि वजन वाढण्यास मदतच होते.

ब्रेड किंवा पाव खाणंही वजन वाढण्यासाठी कारणीभूत ठरतं. ब्रेडमध्ये खूप जास्त मैदा असतो. सॅण्डविच हा अनेकांचा आवडीचा पदार्थ. त्यामुळे तो नाश्त्यामध्ये सर्रास खाल्ला जातो. सॅण्डविचमध्ये भाज्या असल्या तरी ब्रेड असतोच. त्यामुळे त्याच्यावर ताव मारण्याआधी विचार करा. मैद्यामुळे वजन खूप वाढतं. ब्राऊन ब्रेड आपण हेल्दी समजून खातो, पण त्यातही मैदा असतोच. त्यामुळे तो खाणंही टाळायला हवं.

वजन कमी करायचं असेल तर वरील पदार्थ खाणं तर टाळायलाच हवं पण त्यासोबतच आहारातलं प्रोटीन्स आणि फायबर यांचं प्रमाण वाढवायला हवं.

।शिवाय रोजचा व्यायामही खूप महत्त्वाचा आहे. आहार आणि व्यायाम या दोन्ही गोष्टी योग्य पद्धतीने झाल्या तर वजन नक्कीच आटोक्यात राहील.

# सुपार्श्व वॉरियर्स ठरले.. AJCL क्रिकेट लीग चे धुरंदर....

## ६ पैकी ६ मॅच जिंकत ठरले पहिले मानकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** सकल दिगंबर जैन समाज तर्फे AJCL क्रिकेट लीग स्पर्धे चे पहिल्यांदा आयोजन करण्यात आलेले होते, या लीग मध्ये साई नगर येथील सुपार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिराचे सुपार्श्व वारियर्स यांनी अंतिम सामना २९ धावांनी जिंकत सामन्याचे धुरंदर ठरले...

सकल दिगंबर समाज तर्फे पहिल्यांदाच क्रिकेटची लीग मॅच चे आयोजन करण्यात आले..या मध्ये पुरुष गटात १२ टीम सहभागी झाले तर महिला गटात ५ टीम चा सहभाग झाला होता...

या मध्ये पुरुष गटातील साई नगर येथील सुपार्श्व टीम ने ५ पैकी ५ मॅच जिंकत अंतिम सामन्यात स्थान मिळवला.अंतिम सामन्यात सुपार्श्व वॉरियर्स विरुद्ध बघेरवाल ब्लास्टर यांच्यात अटी तटी ची लढत झाली ... पहिली फलंदाज सुपार्श्व वॉरियर्स यांनी केली ..या टीम ने ८ ओहर मध्ये केवळ ३ विकेट गमावून १८४ रन चे लक्ष ठेवले , तर बघेरवाल ब्लास्टर यांनी ८ ओहर मध्ये ६ विकेट गमावून केवळ १५५ रनच काढू शकले..२९ धावांनी सुपार्श्व वॉरियर्स यांनी दणदणीत विजय मिळवत.या लीग च्या.. पहिले विजेता चा मान मिळवला.

या अटी तटी च्या सामन्यात साई नगर येथील सुपार्श्व वॉरियर्स यांनी विजय मिळवत ..सपूर्ण लीग मध्ये ६ पैकी ६ मॅच जिंकत लीग चे धुरंदर ठरले...

या सामन्याचे सामनावीर पार्थ गोरे तर मिथिलेश बंड व वेदांत काळे यांना उत्कृष्ट फलंदाज व बॉलर्स म्हणून सन्मान करण्यात आला.

साई नगर येथील सुपार्श्व वॉरियर्स टीम चे कर्णधार विवेक फुलंबरकर,शशांक चवरे,अमोल पापडकर,समीर विटाळकर, हेमंत बोरीकर,जीवन गोरे, पार्थ गोरे, मिथिलेश बंड व वेदांत काळे याचे दिगंबर समाज तर्फे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.




महिला गटात ५ टीम नी सहभाग घेतला होता.साई नगर येथील सुपार्श्व चॅलेंजर्स यांनी सरळ लढतीत उत्कृष्ट कामगिरी करीत ५ पैकी ४ सामने जिंकत अंतिम सामन्यात प्रवेश मिळवत उप विजेत्या ठरल्या...AJCL लीग चे आयोजन सुजल जैन,रितेश जैन,भावेश जैन, कुशल दर्यापूरकर,निलेश कळमकर, स्वप्नील सिंघई, रोहन देवलसी यांनी केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# विदर्भातून परदेशापर्यंत ड्रग्ज साखळी

# ५ किलो एमडीसह चौघे जेरबंद

## अमरावती कनेक्शनने हादरले प्रशासन; आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–**

अमरावती शहर अंमली पदार्थांच्या तस्करीत राज्यात मागे नसल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. नागपूर येथील विशेष पथकाने केलेल्या धडक कारवाईत नवसारी परिसरातील एका फ्लॅटमधून तब्बल ५ किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात करून चौघांना अटक केली. जप्त केलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे १० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. गोलू आणि आवेश (दोन्ही रा. गवळीपुरा) अशी अटकेतील ड्रग्ज तस्करांची नावे आहेत. अतिशय गुप्त पध्दतीने मुंबईच्या पथकाने ही कारवाई केली. यासंपूर्ण प्रकरणात अमरावती पोलीस अनभिज्ञ होते.





मुंबई येथील महसूल गुप्तचर संचालनालय विभागाच्या पथकाला मुंबई येथून दोन युवक मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्जची तस्करी करीत असल्याची ठोस माहिती मिळताच त्यांनी दोन्ही युवकांचा शनिवारपासून मुंबई येथून ते पाठलाग करीत होते. दरम्यान दोन्ही युवक प्रथम नागपूरला उतरले. त्यानंतर ते कारने अमरावतीला आले तेव्हा पथकातील अधिकारीसुध्दा कारने त्यांच्या मागावर होते. रविवारी दुपारी दोन्ही युवक नवसारी येथील एका फ्लॅटमध्ये थांबले, तेव्हा पथकाने धाड घालून दोन्ही युवकांना ताब्यात घेतले. त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता शहरातील गवळीपुरा येथे राहणारा गोलू आणि आवेश यांना एमडीड्रग्जची खेप देण्याकरिता आल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी गोलू आणि आवेशला ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी सुरु केली. तसेच चौघांपासून पाच किलो एमडी ड्रग्ज जप्त केली, अशी माहिती सुत्रांकडून मिळाली. याकारवाईमुळे अमरावती पोलीस यंत्रणेची झोप उडाली असून, शहरातील वाढत्या ड्रग्ज नेटवर्कचा धक्कादायक पर्दाफाश झाला आहे. विशेष म्हणजे, या ड्रग्ज तस्करीमध्ये सहभागी असलेल्या आरोपींचे आंतरराष्ट्रीय स्तरावर संपर्क असल्याची माहिती समोर येत असून, यामुळे राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. अमरावतीसारख्या शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज साठवणूक व तस्करी सुरू असताना, स्थानिक पोलिसांच्या गुप्तचर विभागाला याची भनकही लागू नये ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. याप्रकरणामुळे अमरावती पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, गुप्तचर यंत्रणा नेमकी काय करत होती? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तर दुसरीकडे, यासंपूर्ण प्रकरणावर पोलीस आयुक्त कठोर भूमिका घेणार का?, तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ड्रग्ज तस्करीचे वाढते जाळे, तरुणाईचे भवितव्य धोक्यात घालणारा हा काळा धंदा आणि पोलीस यंत्रणेतील संभाव्य दुर्लक्ष या साऱ्यांमुळे अमरावती शहर पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

# जिल्ह्यातील १५ शिक्षकांना आयडॉल शिक्षक सन्मान

## शासनाचा स्वयं पुढाकार : विविध मंचावर मिळणार मानसन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

जिल्हा परिषद व राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार मिळण्यासाठी शिक्षकांना स्वतः प्रस्ताव टाकावा लागत होता. प्रथमच महाराष्ट्र सरकारने शालेय स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांची दखल घेत 'आयडॉल टीचर सन्मान' उपक्रम राबविण्यात आला. यात जिल्ह्यातील १५ शिक्षकांची निवड आली. या संदर्भात मागील महिन्यात संभाजी नगर येथे राज्यातील सर्व निवड झालेल्या आयडॉल शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाने दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी आयडॉल शिक्षक व शैक्षणिक संस्था, शाळा बँक नावाने एक नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. यामध्ये शाळा व वर्ग स्तरावर आदर्श व गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या शाळा व आदर्श काम करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेत तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय निवड समितीद्वारा आयडॉल शिक्षकांची निवड करण्यात आली. अध्ययन निष्पत्ती, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, स्कॉफ, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, स्पर्धा परीक्षा, समाज सहभाग, शिक्षकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, अतिरिक्त पूरक वाचन, स्वच्छता, परसबाग, वृक्षसंवर्धन, संगणकीकरण, शाळा व्यवस्थापन समिती, प्रशिक्षण शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार, विद्यार्थी उपस्थिती, पालक जनजागृती आदीं मुद्द्यांवर सरस ठरलेल्या जिल्ह्यातील सर्वोत्तम शिक्षकांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड करण्यात आली.यात जिल्ह्यातून गुणानुक्रमे प्रवीण पवार, जि. प. प्राथमिक शाळा खंडाळा (नांदगाव खंडेश्वर),अनिल जुनघरे सिताबाई संघई प्राथमिक शाळा, अंजनगाव सुर्जी, वीरेंद्र ब्राम्हण जि. प. (मा. शा.) कन्या शाळा, अमरावती, संगीता सोळंके जि. प. उच्च प्राथमिक शाळा, दाभा (नांदगाव खंडेश्वर), शकील अहमद जि. प. पू. मा. शाळा,जळका जगताप (चांदूर रेल्वे), लखनसिंग जाधव जि. प. पू. मा. मराठी शाळा, खोलापूर (भातकुली), सतीश राठोड जि. प. प्राथमिक मराठी शाळा,वाठोडा बू (धामणगांव रेल्वे, किशोर जयस्वाल जि.प. कन्या शाळा, नेरपिंगळाई (मोर्शी),अमोल वहेकर जि.प. प्राथमिक शाळा, खिरपाणी (चिखलदरा), डॉ. सुनिता लहाने जि.प. प्राथमिक शाळा, पोहरा (धारणी), तेजश्री निकम जि. प. शाळा, काटआमला (अमरावती), मनोज सोळंके न.प. मराठी विद्यालय, चांदूर बा, डॉ. प्रतिभा काटोळे जि.प. शाळा, शिरजगांव मोझरी (तिवसा), वैशाली वैराळे जि.प. प्राथमिक शाळा, दिवानखेड (तिवसा), संगीता कोकाटे जि. प. प्राथमिक शाळा, खैरी (दर्यापूर) आदींची निवड करण्यात आली.

विविध मंचावर मानसन्मान शासन निर्णयानुसार आयडॉल शिक्षकांच्या सक्सेस स्टोरी ह्या शब्द व चित्रीकरणाच्या माध्यमातून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) तथा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या संकेतस्थळ तथा विविध कार्यक्रमातून (उदा.शिक्षण परिषद,प्रशिक्षण) शब्द, चित्र, तथा विविध माध्यमाद्वारा प्रकाशित व प्रसारित केले जाणार आहे.

# चिखलदरा कॉफी बागेतून यंदा १५ टन उत्पादन अपेक्षित

## महाराष्ट्रातील एकमेव केंद्रातून ब्रिटीशकालीन बागांची भरभराट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिखलदरा–**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमधील चिखलदरा येथील कॉफी बागेतून यावर्षी १५ टन कॉफीचे उत्पादन अपेक्षित आहे. स्थानिकांच्या दाव्यानुसार, हे महाराष्ट्रातील एकमेव कॉफी उत्पादन केंद्र आहे. येथील अरेबिका जातीच्या कॉफीला बाजारात चांगली मागणी आहे. विदर्भातील उष्ण वातावरणापासून दिलासा मिळवण्यासाठी तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध लावला. येथे कॉफीची लागवड शक्य असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी मोठ्या प्रमाणावर कॉफीची झाडे लावली. वनविभागाच्या माहितीनुसार, सध्या सुमारे ६०० हेक्टर क्षेत्र कॉफीच्या झाडांनी



व्यापले आहे. कॉफीची झाडे मोठ्या झाडांच्या सावलीत वाढतात, कारण त्यांना थेट सूर्यप्रकाश सहन होत नाही. सध्या आंबा, वड आणि इतर सदाहरित झाडांच्या खाली कॉफीची झाडे वाढत आहेत. ब्रिटीशकालीन ती झाडे आजही तशीच आहेत आणि या बागांमुळे स्थानिक आदिवासी युवकांना रोजगार मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात या कॉफीचा उल्लेख केला होता. या बागांची व्याप्ती वाढवून शासकीय मदत मिळाल्यास स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो. सध्या कॉफीच्या झाडांना लाल रंगाची फळे लागली आहेत, जी पर्यटकांना आकर्षित करत आहेत. ही बाग आता पर्यटकांचे एक महत्त्वाचे आकर्षण केंद्र बनली आहे. उत्पादक सुनील भालेराव यांच्या मते, महाराष्ट्रात केवळ चिखलदऱ्यात कॉफीचे उत्पादन होते, याची अनेकांना माहिती नाही. सरकारी यंत्रणांचेही या बागांकडे दुर्लक्ष होत आहे. ब्रिटीश गेल्यानंतर नवीन कॉफीच्या बागा लावण्याचा प्रयत्न झाला नाही. सुनील भालेराव यांनी जुन्या बागांची संख्या वाढवण्याची आणि कॉफी फळापासून भुकटी (पावडर) तयार करण्यासाठी शास्त्रोक्त प्रक्रिया केंद्र उभारण्याची गरज व्यक्त केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे.

# ग्रामसभेतील प्रश्नांवर सरपंच व ग्रामविकास अधिकारी निरुत्तर

## सभेतून बाहेर पडल्याने वादंगसरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

### प्रा. मोरेश्वर इंगळे यांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नांदगाव पेठ–**

नांदगाव पेठ येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ग्रामसभेदरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने तसेच सभेतून सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी काढता पाय घेतल्याने सभेत तणावाचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर महसूल तंटामुक्त समितीचे अध्यक्ष प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांना निवेदन सादर करून सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याची



■ ग्रामसभा उत्साहात पार पडल्याचा प्रशासनाचा दावाप्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ग्रामसभा उत्साहात पार पडली असून नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. ग्रामसभेचा मुख्य विषयही निकाली काढण्यात आला. मात्र सभा संपल्यानंतर काही तरुणांकडून अनावश्यक प्रश्न विचारले जात असल्याने सरपंचांसह आपण कार्यालयात परतल्याचे ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे यांनी स्पष्ट केले. ग्रामसभेतून काढता पाय घेतल्याचा आरोप चुकीचा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मागणी केली आहे. ग्रामसभा ही गावाच्या विकासासाठी महत्त्वाचे लोकशाही व्यासपीठ मानली जाते. यामध्ये नागरिकांच्या सहभागातून विविध विकासकामे, योजनांची अंमलबजावणी तसेच स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेतले जातात. मात्र, या ग्रामसभेत नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्यांवर सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याची नाराजी उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.ग्रामसभेत नागरिकांच्या प्रश्नांचा भडिमार केल्यावर सरपंच कविता डांगे आणि ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे यांनी सभेतून काढता पाय घेतला असा आरोप उपस्थित नागरिकांनी केला. प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ग्रामसभेला सुमारे ४०० नागरिक उपस्थित होते. प्रश्नोत्तरांच्या टप्प्यावर अनेक नागरिकांनी विविध विकासकामे, योजना व प्रशासनिक बाबींवर प्रश्न उपस्थित केले. मात्र, काही प्रश्नांवर स्पष्ट उत्तरे मिळाली नाहीत. त्यानंतर ग्रामसभा संपण्यापूर्वीच सरपंच कविता डांगे व ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे सभागृहातून बाहेर पडल्याने उपस्थित नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सुमारे १३ हजार मतदार व ३० हजार लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या ग्रामसभेचा हा अपमान असून या घटनेची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी केली. यावेळी चारशे नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन देण्यात आले.

# विदर्भ साहित्य संघाचे नेतृत्व अवाययीन व्यक्तीकडे नको

## अमरावतीतील साहित्यिकांचे निवडणुकीपूर्वी महत्त्वाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

अमरावतीतील साहित्यिकांनी विदर्भ साहित्य संघाची धुरा अवाययीन व्यक्तीकडे जाऊ नये, असे आवाहन केले आहे. आगामी निवडणुकीत संघाच्या अध्यक्षपदासाठी राजकीय किंवा व्यावसायिक हितसंबंध असलेल्या व्यक्तींची निवड होण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने ही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

अमरावतीमध्ये विदर्भ साहित्य संघाचे सुमारे ३०० आजीवन सदस्य आहेत, जे या निवडणुकीत मतदान करणार आहेत. स्थानिक साहित्यिकांनी इतर सदस्यांनाही विवेकी, साहित्यिक आणि वाययीन व्यक्तीचीच निवड करण्याचे आवाहन केले आहे. नागपूरमधील काही साहित्यिकांनी अशा अवाययीन उमेदवारांना पाठिंबा देण्याचे ठरवले असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवी विष्णू सोळंके, डॉ. कौमुदी क्षीरसागर-बर्डे, डॉ. कुमार बोबडे, अरुण मंगळे, मधुभाऊ घारड, प्रा. अशोक पळवेकर आणि डॉ. राजेश मिरगे या साहित्यिकांनी ही भूमिका स्पष्ट केली. अशा व्यक्तींना अध्यक्षपदी येऊ नये यासाठी आम्ही काळजी घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

विदर्भ साहित्य संघ ही राजकारणविरहित, व्यावसायिक हेतू नसलेली केवळ साहित्य क्षेत्राची संस्था आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्राबाहेरील लोकांनी यात हस्तक्षेप करू नये, असे साहित्यिकांचे मत आहे. संघाच्या अध्यक्षपदी दूरदृष्टी असलेले, अनुभवी आणि प्रतिष्ठित वाययीन नेतृत्व असावे, अशी त्यांची अपेक्षा आहे.

संबंधित उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांचा खोटेपणा तसेच दडलेला हेतू उघड करण्याची गरज असल्याचेही या साहित्यिकांनी म्हटले आहे. विदर्भ साहित्य संघाच्या सदस्यांनी वाययीन प्रतिभा, प्रतिमा आणि प्रतिष्ठा असलेल्या, तसेच संस्था चालवण्याचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीचीच निवड करून संघाला वाचवावे, असे आवाहन त्यांनी केले.

# 'आरटीई' प्रवेशप्रक्रियेत २२७ खासगी शाळांची नोंदणी

## सात शाळा वगळल्याआता विद्यार्थी प्रवेशाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** :आरटीईअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आर्थिक दुर्बल व वंचित घटकांसाठी विद्यार्थ्यांकरिता खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे. यामध्ये शाळा नोंदणीच्या पहिल्याटप्प्यात शेवटच्या दिवसांपर्यंत २२७ शाळांची नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. यामधून अल्पसंख्याक सात शाळा वगळण्यात आल्या असून आता विद्यार्थी प्रवेशाची प्रतीक्षा लागली आहे. जिल्ह्यात २२७ शाळांमध्येच पटसंख्येच्या २५



टक्के प्रवेश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पाल्यांना दिल्या जाणार आहे. याकरिता ९ जानेवारीपासून शाळा नोंदणी प्रक्रियेला सुरुवातकरण्यात आली. याकरिता १९ जानेवारीची डेडलाइन देण्यात आली होती. मात्र, शाळा नोंदणीला अधिकचा प्रतिसाद मिळाला नाही. अखेर याला ३० जानेवारीची मुदतवाढ देण्यात आली. शेवटच्या दिवशी ४० शाळा नोंदणीच्या शिल्लक असताना शिक्षण विभागाने तातडीने या शाळांची नोंदणी करून घेतल्याने आतापर्यंत २२७ शाळांची नोंदणी पूर्ण झाली आहे.

# अमरावती जिल्ह्याच्या विकास आराखड्याची मागणी १२७२ कोटींची

## शासनाची मर्यादा ४३४.७१ कोटी; अतिरिक्त निधीकडे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती–** अमरावती जिल्ह्याच्या सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा विकास आराखडा नुकताच अंतिम करण्यात आला आहे. यामध्ये जिल्ह्याने १२७२ कोटी ३० लाख ४९ हजार रुपयांची मागणी केली आहे, तर राज्य शासनाने केवळ ४३४ कोटी ७१ लाख रुपयांची मर्यादा (सिलींग) दिली आहे. यामुळे ८३७ कोटी ५९ लाख ४१ हजार रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. हा विकास आराखडा गाभा क्षेत्र, बिगर गाभा क्षेत्र आणि नाविण्यपूर्ण योजना या तीन प्रमुख बाबींवर आधारित आहे. गाभा क्षेत्रासाठी १०१९ कोटी ७७ लाख ६१ हजार रुपयांची मागणी असून, यासाठी ३१७ कोटी २२ लाख ६७ हजार रुपयांचे सिलींग आहे. त्यामुळे गाभा क्षेत्रात ७९२ कोटी ५४ लाख ९४ हजार रुपयांची अतिरिक्त मागणी आहे. त्याचप्रमाणे, बिगर गाभा क्षेत्रासाठी ९५ कोटी ७४ लाख ७९



हजार रुपयांची मर्यादा असताना, २३० कोटी ७९ लाख २५ हजार रुपयांची मागणी नोंदवण्यात आली आहे. एकूण ८३७ कोटी ५९ लाख ४१ हजार रुपयांच्या अतिरिक्त मागणीवर राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

राज्याचा अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी दरवर्षी प्रत्येक जिल्ह्याचा सर्वसाधारण आराखडा मंजूर केला जातो. अमरावतीमध्ये २४ जानेवारी रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या आराखड्याला अंतिम मंजुरी मिळाली. मात्र, ही केवळ जिल्हास्तरावरील मंजुरी आहे. आता राज्याच्या अर्थमंत्र्यांकडे आपली बाजू योग्यपणे मांडून पालकमंत्री किती अतिरिक्त निधी मिळवून देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या संदर्भात माजी पालकमंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले की, पालकमंत्र्यांनी आपले वजन वापरल्यास बऱ्यापैकी अतिरिक्त निधी मिळवता येऊ शकतो. मात्र, सध्याच्या सरकारचे पुणे, मुंबई, नागपूर या शहरांकडे अधिक लक्ष असल्याने अमरावतीला किती निधी मिळेल, हे राज्याच्या अर्थसंकल्पातूनच स्पष्ट होईल. निधीची मागणी करताना पालकमंत्र्यांनी अधिक जोर देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# येवदा, वडनेरगंगाई येथील अनाधिकृत लेआउटचा चेंडू नगर रचना विभागाच्या कोर्टात

## जिल्हाधिकाऱ्यांचे सहाय्यक संचालकांना पत्र, तांत्रिक मंजुरीची करून दिली आठवण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ दर्यापूर :** तालुक्यातील येवदा, वडनेरगंगाई येथील नदी, नाल्यांच्या पूर प्रवण क्षेत्रात (ब्ल्यू झोन) अंथरलेल्या अनधिकृत लेआउटचा चेंडू आता नगररचना विभागाच्या कोर्टात पोहोचला आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नगररचना विभागाच्या सहाय्यक संचालकांना पत्र देत लेआऊट अंथरण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक मंजुरीची आठवण करून दिली. दरम्यान त्यांनी नियमांचे उल्लंघन होणार नाही असे स्पष्ट निर्देश जारी केले आहेत. त्यामुळे अनाधिकृतपणे अंथरलेल्या लेआउटवर संक्रांत घेण्याची शक्यता आहे. येवदा येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज कान्हेरकर यांनी येवदा, वडनेर गंगाई या भागात अंथरलेल्या अनाधिकृत लेआउट बाबत उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती.



कान्हेरकर यांनी तक्रारीत अतिशय गंभीर मुद्दे उपस्थित केले होते. शहाणूर नदी, लेंडी नाला, बोर्डी नदी या नद्यांच्या पूर प्रवण क्षेत्रात काही विकासकांनी लेआउट अंथरूण नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू केला आहे. भविष्यात नैसर्गिक आपत्ती आल्यास या ठिकाणी निर्माण होणाऱ्या मोठ्या लोक वस्तीला यामुळे बाधा पोहोचू शकते या गंभीर बाबीकडे पंकज कानेरकर यांनी महसूल विभागाचे लक्ष वेधून घेतले होते. नियमाप्रमाणे पूरप्रवण क्षेत्रात लेआउट अंथरता येत नाही, असे असतानाही काही विकासकांनी महसूल व नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरत अनधिकृत परवानगी मिळवल्या. यासंदर्भात गंभीर तक्रार पंकज कान्हेरकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेही केली होती. या संदर्भातील मुद्दा त्यांनी शासनाच्या विविध विभागाकडेही लावून धरला होता. त्याच तक्रारीच्या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दखल घेत नगररचना विभागाच्या सहाय्यक संचालकांच्या नावे आदेश काढले आहेत. येरेकर यांनी पत्रात स्पष्ट केले की, 'लेआउटला सर्वप्रथम तांत्रिक मंजुरात आपल्या विभागाकडून दिली जाते. त्यानंतर संबंधित अधिकारी यांच्याकडे प्रकरण मंजुरी करिता पाठवण्यात येते. त्यामुळे सर्व तांत्रिक बाबींची पडताळणी करूनच लेआउटला मंजुरी द्यावी असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी नगररचना विभागाला बजावले आहेत.' त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशावर नगररचना विभाग काय कार्यवाही करते याबाबत आपण पुढेही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत राहणार असल्याची माहिती पंकज कान्हेरकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

### महसूल विभागही क्रॉस चेक करणार

येवदा, वडनेरगंगाई भागात मोठ्या प्रमाणात नियमबाह्य पद्धतीने परवानगी मिळवून काही विकासकांनी भूखंड विकसित केले आहेत. अनेक अधिकाऱ्यांशी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करून या बाबी झाल्याचा तक्रारदार यांचा आरोप आहे. याच प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केल्यामुळे महसूल विभागाचे अधिकारी दिलेल्या परवानगी व लेआउट विकसित करण्यासाठी झालेली कायदेशीर प्रक्रिया याबाबत क्रॉस चेक करणार असल्याचेही माहिती आहे. एकूणच जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशामुळे अनाधिकृत लेआउट अंथरणाऱ्या विकासकांचे चांगले धाबे दणाणले आहेत.

---

श्री समर्थ गजानन महाराज संस्थान, समर्थ विवेकानंद परीसरि येथे

# १४८ वा प्रगट दिन महोत्सवाला उत्साहात सुरूवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** श्री समर्थ गजानन महाराज संस्थान, समर्थ विवेकानंद कॉलनी परिसर, अमरावती येथे प्रगट दिन महोत्सव २०२६ या ठिकाणी आज शिव महापुराण उत्साहात सुरुवात झाली शिवमहापुराण एक फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी पर्यंत होणार आहे आज भाविक भक्त यांनी शिव महापुराण ऐकण्यासाठी मोठी गर्दी केली होती त्यांचं बरोबर भक्तिमय वातावरणात सर्व तल्लीन झाले होते शिव महापुराण कथा आकाश महाराज लक्षणे कोंडाळी यांच्या वाणीतून आठ दिवस होणार आहे भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. आज शिव महापुराण कथेमध्ये अतिशय सुंदर झाकी चे सादरीकरण करण्यात आले महोत्सव म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला अध्यात्मिक मार्गदर्शन देणारा, संस्कारांची जपणूक करणारा आणि भक्तांना एकत्र आणणारा पवित्र सोहळा ठरला.श्री समर्थ गजानन महाराज हे विदर्भातील एक थोर संत असून त्यांनी आपल्या जीवनातून भक्ती, सेवा, त्याग आणि मानवता यांचे आदर्श मूल्य समाजासमोर



ठेवले. त्यांच्या शिकवणीतून माणसाला आत्मिक शांती, संयम आणि सकारात्मक जीवनदृष्टी मिळते. त्यामुळे दरवर्षी त्यांचा प्रगट दिन मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. या वर्षीचा १४८ वा प्रगट दिन महोत्सव विशेष आकर्षण रहाणारया महोत्सवानिमित्त श्री समर्थ गजानन महाराज संस्थानच्या वतीने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . सकाळी अभिषेक, पूजन, आरती, भजन, कीर्तन यांसारख्या कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भरून गेला होता. दूरदूरून आलेले भक्त, साधू-संत, महिला, युवक आणि वृद्ध अशा सर्वांनी या सोहळ्यात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे शिव महापुराण कथा होय. या कथेचे कथाकथन आकाश महाराज लक्षणे, कोंडाळी यांनी आपल्या मधुर आणि प्रभावी वाणीतून केले. त्यांच्या कथाकथन शैलीमुळे भक्त मंत्रमुग्ध झाले. शिव महापुराणामधील भगवान शिवाचे चरित्र, त्यांची लीला, भक्तांवरील कृपा, तसेच शिवतत्त्वाचे गूढ अर्थ त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ भाषेत उलगडून सांगितले.आकाश महाराज लक्षणे यांचे कथाकथन केवळ धार्मिक माहिती देणारे नसून ते श्रोत्यांच्या मनाला स्पर्श करणारे होते. त्यांनी आपल्या वाणीतून जीवनातील सत्य, कर्माचे महत्त्व, अहंकाराचा त्याग, भक्तीचे सामर्थ्य आणि ईश्वरप्राप्तीचा मार्ग याविषयी अत्यंत प्रभावी उदाहरणांसह मार्गदर्शन केले. त्यामुळे उपस्थित भक्तांना केवळ कथा ऐकण्याचा आनंदच नव्हे, तर जीवनात आचरणात आणण्यासारखे मौल्यवान विचार मिळाले.शिव महापुराण कथेच्या माध्यमातून समाजाला अध्यात्मिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस तणावग्रस्त, अस्वस्थ आणि दिशाहीन होत चालला आहे. अशा परिस्थितीत संतांची शिकवण आणि पुराणातील कथा मनाला शांती देणाऱ्या ठरतात. आकाश महाराजांनी शिवभक्तीचे महत्त्व सांगताना भगवान शिव हे वैराग्याचे प्रतीक असून ते आपल्याला साधेपणा, संयम आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग दाखवतात, हे सुंदर रीतीने स्पष्ट केले.या कार्यक्रमासाठी श्री समर्थ गजानन महाराज संस्थानच्या सर्व विश्वस्त मंडळाने विशेष परिश्रम घेतले. व्यवस्थापन, भक्तांसाठी प्रसाद व्यवस्था, स्वच्छता, निवास, पाणी आणि आरोग्य सुविधांची उत्तम सोय करण्यात आली होती. त्यामुळे भाविकांना कोणताही त्रास न होता कार्यक्रमाचा लाभ घेता आला.

---

# साहेब, तुमची निवडणूक झाली पण आमच्या समस्या सुटणार का ?

## नांदगाव खंडेश्वर शहरातील नागरिकांचा थेट सवाल : निवडणुकीतील आश्वासने हवेत विरणार की विकासाला मिळणार गती ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नांदगाव खंडेश्वर**

सत्ता कोणाचीही येवो मात्र आमच्यासमोरील प्रश्न मात्र 'जैसे थे'च राहतात असा थेट व संतप्त सूर नांदगाव खंडेश्वर शहरातील महिला व पुरुष मतदारांमधून उमटत आहे. नगर पंचायत निवडणुकीची रणधुमाळी संपली, नवे नगरसेवक निवडून आले, सत्तास्थाने भरली मात्र आता खऱ्या अर्थाने जनतेची परीक्षा सुरू झाली आहे. निवडणुकीदरम्यान रस्ते, पाणी, स्वच्छता, क्रीडांगणे, उद्याने, सभागृह अशा मूलभूत प्रश्नांवर भरभरून आश्वासने देण्यात आली. परंतु निवडणुका संपताच ती आश्वासने हवेत विरणार काय, अशी शंका मतदार व्यक्त करत आहेत. आम्ही शहरातील समस्या सोडवणाऱ्यालाच मत दिले आहे. आता काम करून दाखवण्याची वेळ आली आहे, असा स्पष्ट इशारा नागरिक देत आहेत.शहर अस्वच्छतेच्या विळख्यात आरोग्य धोक्यात

नांदगाव खंडेश्वर शहरात सध्या सर्वत्र अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. कचराकुंड्यांचा अभाव, नाल्यांची नियमित साफसफाई नसणे, सांडपाणी रस्त्यावर साचणे यामुळे दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी आजारांचे प्रमाणही वाढत असून आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असून जी आहेत त्यांची स्थिती दयनीय आहे. स्वच्छतेअभावी नागरिक त्याचा वापर टाळतात. शहरातील प्रमुख रस्त्यांवर अतिक्रमण वाढल्याने वाहतूक आणि स्वच्छता दोन्ही प्रश्न अधिकच गंभीर झाले आहेत. शहर अतिक्रमणमुक्त करणे आता काळाची गरज आहे, अशी नागरिकांची मागणी आहे. पाणी, रस्ते, वाहतूक महिलांचा संताप, नागरिक त्रस्त महिलांच्या दृष्टीने सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे पिण्याच्या पाण्याचा. आठवड्यातून केवळ एकदाच पाणी येत असल्याने नोकरदार, कामगार महिलांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शहराला किमान आठवड्यातून दोन वेळा तरी पाणीपुरवठा करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे. रस्त्यांची अवस्था अतिशय खराब असून खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. बसस्थानक परिसरात सतत वाहतुकीची कोंडी होत असून




नागरिक हैराण झाले आहेत. या ठिकाणी तातडीने ट्रॅफिक सिग्नल बसवण्याची गरज आहे. तसेच शहरातील महत्त्वाच्या चौकात हायमास्ट दिवे बसवावेत, जेणेकरून रात्रीच्या वेळी सुरक्षितता वाढेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भटके कुत्रे, मोकाट जनावरे आणि अपूर्ण विकास शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून मोकाट जनावरे रस्त्यावर फिरत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. लहान मुले, वृद्ध वमहिलांसाठी ही बाब धोकादायक ठरत आहे. यावर नगर पंचायतने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. नांदगाव खंडेश्वर हे ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर असले तरी येथे सुसज्ज मैदान, सभागृह, वाचनालय, उद्याने व विरंगुळ्याची साधने अपुरी आहेत. खेळाडूंना खेळण्यासाठी मैदान नाही, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी योग्य सभागृह नाही ही शहराच्या विकासाला लागलेली मोठी मर्यादा आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सत्ताधारी व विरोधकांनी एकत्र येऊन अधिकाधिक शासकीय निधी खेचून आणणे गरजेचे आहे.निवडणूक संपली, सत्ता स्थापन झाली आता केवळ राजकारण नव्हे तर काम करून दाखवण्याची वेळ आली आहे. साहेब, तुमची निवडणूक झाली हो पण आमच्या नेहमीच्या समस्या आता तरी सोडवा, असा थेट सवाल करत नांदगाव खंडेश्वरचा नागरिक नगर पंचायतीच्या नवनियुक्त पदाधिकारी आणि नगरसेवकांच्या उत्तरांची वाट पाहत आहे.

---

# चांदूर रेल्वेत १८ कोटींच्या विकासकामांना ब्रेक

## निविदा प्रक्रिया रद्द; केवळ एकच काम 'जैसे थे'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२चांदुर रेल्वे–** नगर परिषद निवडणुकीआधीच्या चांदूर रेल्वे शहरातील १८ कोटींच्या विकासकामांना ब्रेक लागल्याची विश्वसनीय माहिती प्राप्त झाली आहे. सदर निविदा प्रक्रियाच रद्द झाली असून केवळ एकच काम 'जैसे थे' ठेवण्यात आल्याचे समजते. यामुळे शहरवासीयांच्या विकासाच्या स्वप्नांवर पाणी फेरले का? अशी चर्चा सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी शहरातील विविध विकासकामांसाठी आमदार प्रताप अडसड यांच्या प्रयत्नातून सुमारे १८ कोटींचा विकास निधी मंजूर करण्यात आला होता. नगरपरिषदेचे कामकाज प्रशासकीय नियंत्रणात असल्याने सुरुवातीला ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रियेत टाकण्यात आली होती. मात्र नगरपरिषद निवडणुकीचे वारे वाहू लागल्यानंतर अचानक सार्वजनिक बांधकाम विभागाची निविदा प्रक्रिया रद्द करून ही सर्व कामे नगरपरिषदेच्या अखत्यारित वळविण्यात आली. त्यानंतर नव्याने तब्बल १८ कोटीच्या




विकासकामांसाठी नगरपरिषदेतर्फे ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या. या निविदा प्रक्रियेत काही ठेकेदारांकडून निविदा मॅनेज करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची खमंग चर्चा शहरात रंगली होती. मात्र, ठेकेदारांमध्ये एकमत न झाल्याने आणि दरम्यान निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यामुळे निविदा उघडता आल्या नाहीत, परिणामी शहरातील विकासकामांचे भूमिपूजनच रखडले. यानंतर शुक्रवार ३० जानेवारीला नगरपरिषद बांधकाम विभागाकडून ऑनलाईन निविदा धारकांना मेलद्वारे निविदा रद्द झाल्याचा संदेश देण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

**ठेकेदारांच्या तक्रारीमुळे निविदा रद्द**

नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, नगरपरिषदेकडून काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत काही ठेकेदारांच्या तक्रारी आल्या असून काही कामांसाठी अपूर्ण निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. मागील निविदेतील एका कामाचे कागदपत्र पडताळणी सुरू असून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल. हा संपूर्ण निधी शहराच्या विकासासाठीच वापरण्यात येणार आहे.

**निविदा फी परत मिळावी**

सुशिक्षित अभियंता संघटनेचे अध्यक्ष अतुल शिरभाते व सचिव कशिश शर्मा यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, चांदूर रेल्वे नगरपरिषदेत ऑनलाईन निविदा प्रक्रियेत जाचक अटी टाकण्यात आल्या. त्यामुळे नवीन व सुशिक्षित ठेकेदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

एका कामासाठी निविदा खरेदी १५०० रुपये, स्टॅम्प ड्युटी ७०० रुपये, नोटरी फी ३०० रुपये असा किमान २५०० रुपयांचा खर्च येतो. एखाद्या ठेकेदाराने १० ते १५ निविदा भरल्या असतील तर २५ ते ३० हजार रुपयांचा फटका बसतो. त्यामुळे निविदा फी परत देण्यात यावी.

---

# अमरावतीमध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

### १०७ विद्यापीठांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती:** श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष व महिला) स्पर्धा २०२५-२६' चे भव्य उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. सॉफ्टबॉल च्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने एक नवा इतिहास रचला आहे.खेळातून घडते चारित्र्य: पोलीस आयुक्त गणेश शिंदेकार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना पोलीस आयुक्त श्री. गणेश शिंदे यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. अमरावती हे प्रदूषणमुक्त आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध शहर असून येथील पोषक वातावरणात ही स्पर्धा होत आहे, असे ते म्हणाले. खेळ केवळ हार-जित पुरता मर्यादित नसून तो खेळाडूंना 'ग्राउंडेड' राहायला आणि कठीण परिस्थितीत जिद्दीने उभे राहायला शिकवतो. आजची तरुण पिढी तंत्रज्ञान आणि विज्ञानात प्रगती करत असतानाच खेळाच्या माध्यमातून देशाची जबाबदारी पेलण्यास सक्षम होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिवाजी शिक्षण संस्थेचा ऐतिहासिक पुढाकार: हर्षवर्धन देशमुखसंस्थेचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धन देशमुख यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले की, सॉफ्टबॉलसारख्या खेळाला राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी शिक्षण संस्थेने पुढाकार घेतला आहे. संपूर्ण भारतातून आलेल्या खेळाडूंना अमरावतीचे आदरातिथ्य आणि संस्कृतीची ओळख करून दिली जाईल. खेळाडूंनी मैदानावर केवळ कौशल्यच नाही, तर शिस्त आणि खिलाडूवृत्तीचेही दर्शन घडवावे.नियोजनाची जय्यत तयारी: दिलीपबाबू इंगोलेया स्पर्धेच्या नियोजनाबद्दल माहिती देताना श्री. दिलीपबाबू इंगोले म्हणाले की, देशभरातील १०७ विद्यापीठांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. ५ तारखेपर्यंत पुरुषांचे सामने रंगणार असून ६ ते १० तारखेदरम्यान महिलांच्या स्पर्धा होतील. विशेष म्हणजे, या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर 'ऑल इंडिया' भारतीय संघासाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. मैदानावर फ्लड लाईट्सची सोय करण्यात आल्याने रात्रीच्या वेळीही सामने खेळवले जाणार आहेत.अध्यक्षीय समारोप: डॉ. महेंद्र ढोरेकार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रकुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आपल्या भाषणात अमरावतीच्या क्रीडा वारशाचा गौरव केला. खेळ हे सर्वांगीण विकासाचे साधन असून त्यातून मिळणारा संयम आणि सांघिक भावना जीवनात महत्त्वाची ठरते. स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणारे हे आयोजन देशासाठी अभिमानास्पद आहे, असे त्यांनी सांगितले.या स्पर्धेच्या तांत्रिक जबाबदारीसाठी देशपांडे सर आणि दिलीप तुर्की यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांची समिती काम पाहत आहे. खेळाडूंना खेळासोबतच अंबादेवी मंदिर आणि चिखलदरा यांसारख्या पर्यटन स्थळांची माहिती देऊन अमरावतीच्या वैभवाची ओळख करून दिली जात आहे.





---

# धारणी येथे ८ फेब्रुवारीला शासकीय योजनांचा भव्य महामेळावा

## सुप्रीम कोर्ट, उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांची विशेष उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२धारणी,** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार येत्या ८ फेब्रुवारी रोजी धारणी येथे विधी सेवा महामेळा तसेच शासकीय योजनांचा भव्य महामेळा आयोजित करण्यात येत आहे. हा उपक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती तथा धारणी तालुका विधी सेवा प्राधिकरण,धारणी, तहसील कार्यालय धारणी, पंचायत समिती धारणी तसेच विविध शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार आहे. या महामेळाव्यास सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय व अमरावती जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांची विशेष उपस्थिती राहणार असून नागरिकांना कायद्याविषयक मार्गदर्शन, न्यायप्रक्रियेची सविस्तर माहिती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा, याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जाणार आहे.महामेळ्व्यांत नागरिकांना विविध शासकीय योजनांची विस्तृत माहिती देण्यात येणार असून निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिर, रेशन कार्ड, आधार कार्ड दुरुस्ती, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, विधवा व वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, शेतकरी कल्याण योजना, महिला व बालकल्याण विभागाच्या योजना तसेच दुर्बल, गरजू व वंचित घटकांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रक्रिया एका छताखाली उपलब्ध करून दिली जाणार आहे. महामेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी धारणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार अवतारसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच यासंदर्भात एक समन्वय बैठक पार पडली. या बैठकीत वरिष्ठ अधिवक्ता सुभाष मनवर, तसेच न्यायालयीन अधिकारी उपस्थित होते. यावेळी पोलिस कर्मचारी, पंचायत समितीचे अधिकारी व विविध शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांना शिबिरात आणण्यासाठी तसेच त्यांना योजनांचा थेट लाभमिळवून देण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन करण्यात आले.

---

# मोर्शीतले प्रशासन महात्मा गांधींना विसरले पुण्यतिथीला अभिवादनच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मोर्शी–** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी भारत देशाला स्वतंत्रता मिळवून देण्याकरिता आपल्या प्राणाची आहुती दिली. सत्याग्रह व चळवळीच्या माध्यमातून लोकांच्या मनामध्ये इंग्रज सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण केला. शुक्रवारी महात्मा गांधीजींची पुण्यतिथी होती. त्याचाच विसर येथील प्रशासनला पडला. म. गांधीजींची जयंती अथवा पुण्यतिथी म्हटली तरी संपूर्ण देश त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता एकत्र येतो. त्यांच्या प्रतिमा, पुतळे याला श्रद्धापूर्वक नमन करून माल्यार्पण करतात. पण, शुक्रवारी मोर्शी शहरांमध्ये याउलट घडले. स्थानिक सोशल क्लबच्या मैदानामध्ये महात्मा गांधींचा पुतळा मागील सहा दशका पासून उभारलेला आहे. महात्मा गांधी यांची पुण्यतिथी असून सुद्धा स्थानिक प्रशासनाला त्याचा विसर पडला. सोशल क्लबच्या मैदानावर असलेल्या गांधी पुतळ्याला शुक्रवारी ना माल्यार्पण करण्यात आले ना पूजन करण्यात आले. स्वच्छतेचा संदेश देणार्या महात्म्याच्या पुतळा परिसराची साफसफाई सुद्धा करण्यात आली नाही. वर्षानुवर्षे सत्याग्रहाच्या माध्यमातून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणार्या गांधीजींचा स्थानिक नगर परिषद, महसूल विभाग, सामाजिक संस्था यांना विसर पडला. इतकेच नव्हे तर नेहमी मिरवा मिरव करून आपले फोटो काढून घेणारे राजकीय नेते, नगरसेवक, नगरसेविका व कार्यकर्ते ही या पुण्यतिथीच्या दिवशी महात्मा गांधींच्या पुतळ्या जवळ कोणीही



फिरकले नाही. महात्मा गांधीजींच्या नावावर मोठे स्वच्छता अभियान राज्य शासनातर्फे राबविण्यात येते. त्यामुळे करोडो रुपयांची उलाढाल केली जाते. त्याच योजनेच्या माध्यमातून सोशल क्लबच्या मैदानात असणार्या महात्मा गांधींच्या पुतळा परिसराला स्वच्छ करण्याची जबाबदारी प्रशासनाची होती. महात्माजींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहने हे त्यांना गरजेचे वाटले नाही.

# सीसीटीव्ही बसविण्यात कासवगती कंत्राटदाराला सीईओंची नोटीस

## २५५ पैकी फक्त ५५ शाळांतच पूर्तता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

विद्यार्थ्यांच्या, विशेषतःमुलींच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत जिल्हा परिषदेने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. शासनाच्या निर्देशानुसार हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत असून, ही प्रक्रिया मात्र मंद गतीने सुरू असल्याने सीईओ संजिता महापात्र यांनी संबंधित कंत्राटदाराला नोटीस देत तातडीने सीसीटीव्ही लावण्याचे आदेश दिले आहे. पहिल्या टप्प्यात २५५ पैकी आजवर केवळ ५५ जिल्हा परिषद आले आहे. शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यातशासनाच्या आदेशावरून जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये सर्वाधिक मुली असणार्या आणि शंभरपेक्षा अधिक पटसंख्या असणार्या २५५ शाळांची निवड करण्यात आली होती. याकरिता २ कोटी ३९ लाखांची तरतूद करीत या शाळांमध्ये सीसीटीव्ही संच बसविण्याला मंजुरात देण्यात आली. याचा कंत्राट मागील वर्षी पुणे येथीलसुपर कॉम्प्युटरला देण्यात आला. दरम्यान, कंत्राटदाराकडून सीसीटीव्ही कॅमेर्यांच्या व्हॅल्युएशनमध्ये वाढीव दराची मागणी करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने ही मागणी फेटाळून लावत शासकीय निधीच्या योग्य वापरावर ठाम भूमिका घेतली. या निर्णयामुळे काही काळ प्रक्रिया मंदावली. त्यामुळे सीईओंनी सदर कंत्राटदाराना नोटीस बजावित कामांना गती देण्याचे आदेश दिले.सद्यस्थितीत जिल्ह्यात ५५ शाळांमध्ये सीसीटीव्ही लावल्याचा दावा शिक्षणविभागाकडून केल्या जात आहे तर २०० शाळांमध्ये वायरींग लावण्यात आली आहे. त्यामुळे २५५ शाळांमधील सीसीटीव्ही लावण्याची प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण पुढील टप्प्यात ५० पेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचे नियोजन शिक्षण विभागाकडून केले जात आहे. एकूणच जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असून, लवकरच सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी जोर धरत आहे.

# ऐन रब्बी हंगामात युरियाची टंचाई

## गहू, हरभरा, कांदा पिके धोक्यात –शिरजगाव परिसरातील शेतकरी अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चांदुर बाजार**

शिरजगाव कसबा हद्दीत सध्या युरिया खताची तीव्र टंचाई निर्माण झाली असून रब्बी हंगामातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. गहू, चणा, कांदा, भाजीपाला तसेच इतर पिकांना वेळेत युरिया न मिळाल्यास पिके पिवळी पडून उत्पादनात घट होण्याची भीती शेतकर्यांना वाटत आहे.



गावात व परिसरात अनेक कृषी सेवा केंद्रे असतानाही युरिया उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. परिणामी, शेतकरी एका दुकानातून दुसर्या दुकानात भटकंती करूनही युरिया नसल्याने हवालदिल झाला आहे. कृषी विभागाने आधीच अंदाज घेऊन साठा उपलब्ध करून देणे अपेक्षित होता. शासन एकीकडे शेतकर्यांना युरियाची कमतरता पडू देणार नाही, असे जाहीरपणे सांगते, मग प्रत्यक्षात शेतकर्यांना युरिया कमी का पडतो? असा थेट सवाल उपस्थित होत आहे. ही टंचाई जाणीवपूर्वक निर्माण करून आर्थिक नफाखोरी तर केली जात नाही ना, अशी चर्चा जोर धरत आहे. जर साठेबाजी करून जादा दराने युरिया विकण्याचे प्रकार सुरू असतील, तर यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नेमकी आहे कुठे, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. परिसरात तातडीने युरिया पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, त्याची जबाबदारी कोण घेणार, असा थेट सवाल आता शेतकरी करत आहेत.

### मागणी वाढल्याने कमतरता


ग्रामीण भागात युरिया साठा पुरेसा उपलब्ध असून, शहरात थोड्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. सद्य स्थितीत ६ हजार युरिया बॅग्स उपलब्ध असून, येत्या २ दिवसांत जिल्ह्याला ३ ते ४ रॅक युरिया उपलब्ध होईल. गव्हासाठी मागणी वाढल्याने कमतरता भासत आहे. अवैध साठा किंवा जादा दराने विक्री होत असल्यास, तक्रार कृषी विभागाकडे करावी, निश्चित कारवाई केल्या जाईल. युरिया नियमित पुरवठा करण्यासाठी वरिष्ठांशी पत्रव्यवहार केलेला आहे.

**–प्रवीण मोहोड**
**तालुका कृषी अधिकारी, चांदूर बाजार**

# ठेकेदार–सरपंच यांच्यात हाणामारी

## शाब्दिक वादाचे मारहाणीत पर्यावसान, वाशिम जिल्हा परिषदेतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ वाशिम**



जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात २९ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास मालेगाव तालुक्यातील एका ठेकेदार (कंत्राटदार) व सरपंच यांच्यात शाब्दिक वादातून थेट मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, या घटनेनंतरही अद्याप कोणत्याही बाजूकडून पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलेली नसल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

कामानिमित्त गुरुवारी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात काही ठेकेदार व सरपंच उपस्थित होते. त्यामध्ये संबंधित ठेकेदार व सरपंच यांचाही समावेश होता. दोघे समोरासमोर आल्यानंतर एका महत्त्वाच्या कामावरून सुरुवातीला शाब्दिक वाद झाला. पाहता–पाहता हा वाद अधिक तीव्र होत गेला आणि काही क्षणांतच हातघाईची वेळ आली. घटनेची माहिती पसरताच जिल्हा परिषद परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली. मात्र, दोन्ही पक्षांकडून कोणतीही अधिकृत तक्रार दाखल न झाल्यामुळे वाद नेमका कोणत्या कारणावरून झाला, याबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

# पक्षाशी विश्वासघात म्हणजे आईशी विश्वासघात

## उमेदवारांच्या विरोधात काम करणाऱ्यांना थेट 'घरचा रस्ता', चंद्रशेखर बावनकुळेंचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परभणी**



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एकाच दिवसात पाच जाहीर सभा घेत प्रचाराचा धडाका लावला आहे. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी पक्षांतर्गत बंडाळी आणि शिस्तभंगाबाबत अत्यंत कडक भूमिका मांडली. पक्षाशी विश्वासघात करणे म्हणजे स्वतःच्या आईशी विश्वासघात करण्यासारखे आहे, असे भावनिक आवाहन करत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, जे कोणी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम करतील, त्यांना तत्काळ 'घरचा रस्ता' दाखवला जाईल.

परभणी जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपने आपला प्रचाराचा झंझावात सुरू केला असून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एकाच दिवसात पाच जाहीर सभा घेत जिल्हा ढवळून काढला आहे. हेलिकॉप्टरच्या साहाय्याने त्यांनी जिंतूर ते गंगाखेड अशी जिल्ह्याची दोन टोके गाठत अत्यंत वेगवान दौरा केला. यावेळी त्यांच्यासोबत पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या दौऱ्यात प्रामुख्याने जिंतूर तालुक्यातील इटोली, झरी, दैठणा, महातपुरी आणि वडगाव या पाच ठिकाणी सभांचे आयोजन करून त्यांनी मतदारांशी थेट संवाद साधला.

या जाहीर सभांमधून बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना विकासाच्या मुद्द्यावर भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन जनतेला केले. मात्र, त्याच वेळी त्यांनी पक्षांतर्गत शिस्तीबाबत अत्यंत कडक संकेत दिले. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात छुप्या किंवा उघडपणे काम करणाऱ्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना कोणत्याही परिस्थितीत माफी मिळणार नाही, त्यांना थेट 'घरचा रस्ता' दाखवला जाईल, असा सज्जड इशारा त्यांनी दिला. बावनकुळे यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिकच तापले असून बंडखोरांचे धाबे दणाणले आहेत.

# भरधाव कार बॅरिकेट्सवर धडकली

## चालकाला डुलकी लागल्याचा परिणाम; समृद्धी महामार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ वाशीम**

समृद्धी महामार्ग नागपूर कॉरिडोरवरील चॅनल क्रमांक २०२+८०० या ठिकाणी शनिवारी सकाळी एक अपघात घडला. पुणे येथून नागपूरकडे जात असलेल्या एमएच १४ जेएक्स ७८३५ क्रमांकाच्या कारमधील चालकास झोपेची डुलकी लागली. यामुळे ही कार अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या साईटच्या लोखंडी बॅरिकेट्सला धडकली.

अपघातग्रस्त कार चालक राजेश महल्ले (वय ३० वर्षे, रा. नागपूर) हा वाहन चालवत होता. प्रवासादरम्यान अचानक त्याला डुलकी लागल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट बॅरिकेट्सवर आदळली. या अपघातात कारचे नुकसान झाले असले तरी सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. या अपघातामध्ये चालक राजेश महल्ले तसेच त्याच्यासोबत प्रवास करणारे अजिंक्य सिंह बैस (वय ३७ वर्षे, रा. नागपूर) यांना हात व पायाला किरकोळ स्वरूपाच्या जखमा झाल्या.

अपघातानंतर दोघांनाही तात्काळ स्थानिक डॉक्टरांकडून प्राथमिक उपचार देण्यात आले. पुढील उपचारासाठी दवाखान्यात जाण्याबाबत विचारणा करण्यात आली असता, दोघांनीही उपचारांची आवश्यकता नसल्याचे सांगितले. अपघाताची माहिती मिळताच पीएसआय पवार, पोलीस कर्मचारी यांच्या सह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणून अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या कडेला सुरक्षितरीत्या हलवले. त्यामुळे नागपूर कॉरिडोरवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली असली तरी लवकरच ती सुरळीत करण्यात आली. सदर अपघातामुळे वाहन चालविताना विश्रांतीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, चालकांनी दीर्घ प्रवासादरम्यान सतर्कता बाळगावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# वरूड सायकल स्पर्धेत ३५० स्पर्धकांनी घेतला सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वरूड**



सायकलस्वार बहुउद्देशीय संस्था व वरूड नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरण संरक्षणाच्या जनजागृतीसाठी तालुकास्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ३५० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

देशबंधुदास वाचनालय येथून स्पर्धेला प्रारंभ झाला. यावेळी मुख्याधिकारी गजानन भोयर, डॉ. विजय देशमुख, सुजलाम आदर्श गाव चळवळीचे प्रमुख रवी मानव, सायकलपटू सुजल कोहळे, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, साईबाबा पालखी सायकल यात्रा समूह (शेंदूरजनाघाट) तसेच संजय जयस्वाल व संच यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेचा मार्ग वरूड ते टेंभूरखेडा ते बहादा ते वरूड असा ३० किमी ठेवण्यात आला होता. यामध्ये १४ वर्षांवरील गटासाठी ३० किमी, तर १४ वर्षाखालील गटासाठी २० किमी तर निश्चित करण्यात आले होते. १४ ते १७वर्षे मुलांच्या गटात पीयूष सालोहे आयुष सारडे व सुमित राऊत, याच वयोगटात मुलींमध्ये पूर्वा कवटकर, पलक आगरकर व समृद्धी पेठे, १८ ते ३० वर्षे पुरुष गटात उदय दारोकर, ऋषिकेश जावरकर व भूषण इंगळकर, महिला गटात समीक्षा तायवाडे, शीतल बावणे व साक्षी नेवारे, ३१ ते ४५ वर्षे खुल्या पुरुष गटात प्रवीण धावळे, अमित खासबागे व विजय बाखल, ४६ ते ६० वर्षे पुरुष गटात मंगेश लुंगे, विजय फुटाणे १४ वर्षांखालील मुलांच्या गटात हितांश टाणे व हरिहर वरूडकर, बेलसरे, मृदूल बारसागडे व आराध्य मांडवे, मुलींच्या गटात स्नेहा खंडेलवाल, पूर्वी नारिंगे, विदाश्री बोडखे यांनी पहिली तीन बक्षिसे पटकावली. ६० वर्षांवरील वयोगटात उद्धव फुटाणे, सुरेश जैन (८२, नागपूर), प्रमोद लोंढे, रामदास दांडे, डॉ. राम गोधणे या ज्येष्ठ सहभागींचा सन्मान करण्यात आला. ४६ ते ६० वर्षे महिला गटात रिया तिडके यांनी प्रथम क्रमांक मिळवला.सर्वाधिक स्पर्धक न्यू ऑरेंज सिटी येथून सहभागी झाल्याबद्दल मुख्याध्यापिका माधुरी भोंडे व शिक्षक पराग भोंडे यांचा सत्कार करण्यात आला. खांडेलवाल यांनी आभार प्रदर्शन केले. बाळा चांगदे संचालन व पीयूष माजी सैनिक देवानंद मेश्राम यांनी बक्षीस नगरपरिषद सदस्य, कर्मचारी, पोलिस वितरण केले. संस्थेचे योगेश गीद, ठाणे तसेच नागरिकांचे सहकार्य लाभले.

# निराला बाजारात फिल्मी स्टाईल राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ छत्रपती संभाजीनगर**

संभाजीनगरातून एक फिल्मी स्टाईल घडामोड समोर येते आहे. हा स्टोरी ऐकून तुम्हाला एखाद्या चित्रपटाची स्टोरी वाटेल. पण तसं नाही आहे. हि घडामोड अगदी खरी आहे. खऱ्या जीवनातील आहे.शहरातील गजबजलेला भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निराला बाजार परिसरात एका पान टपरीचालकाला पिस्टल आणि चाकूचा धाक दाखवून लुटल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सिगारेट आणि ५ हजार रुपयांच्या मागणीवरून सुरू झालेला हा वाद थेट प्राणघातक धमकी आणि लुटीपर्यंत पोहोचला. याप्रकरणी क्रांतीचौक पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# झडती घेताना कैदी खवळला कारागृहात कैद्याचा तुफान राडा

## जिवे मारण्याची ही दिली धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**



येथील मध्यवर्ती कारागृहात एका कैद्याने कारागृह प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण करून वरिष्ठ कारागृह अधिकाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात संबंधित कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५:२० ते ५:५०च्या दरम्यान ही घटना घडली. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी कारागृहाचे अतिरिक्त अधीक्षक विकास भोईटे यांच्यावतीने कारागृह शिपाई ईश्वर डहाने यांनी दिलेल्या तक्रारीनुसार कैदी नितेश उर्फ सूर्या सोनू अनिल जैस्वाल (३३, रा. नागपूर) याच्याविरुद्ध ३१ जानेवारी रोजी उशिरा रात्री गुन्हा दाखल केला.एफआयआरनुसार, ३० जानेवारी रोजी सायंकाळी कारागृह प्रशासनाकडून बॅरेक क्रमांक ६ची नियमित झडती घेतली जात होती. यावेळी कारागृह शिपाई आणि अधिकारी कैद्यांच्या सामानाची तपासणी करत होते. वरिष्ठ तुरुंग अधिकारी देवराव जाधव आणि त्यांचे सहकारी कैदी नितेश उर्फ सुर्या सोनू अनिल जैस्वाल याच्या सामानाची झडती न घेऊ लागले, तेव्हा त्याने आक्रमक पवित्रा घेतला. नितेशने त्याची प्लास्टिकचे बादली व इतर साहित्य तपासण्यास विरोध केला. तपासणीदरम्यान नितेशने आरडाओरडा करत अधिकाऱ्यांना धमकावले.

### मोबाइल, पेनड्राइव्ह अन् गांजाही सापडला

विशेष म्हणजे, या कारागृहातील अतिसंरक्षित अंडा बॅरेकसह आतील आवारात कैद्यांकडे सहा महागडे मोबाइल, आयफोन, बॅटरी तथा एक पेनड्राइव्ह आढळला होता. तत्पूर्वी, अनेकदा गांजाचे बॉल, चरसही आढळून आले आहेत.

### बलात्कार, पॉक्सोचा कैदी, नागपुरातही गैरवर्तन

शिक्षाबंदी नितीश उर्फ सूर्या याच्याविरूद्ध सन २०१६मध्ये बलात्कार, अनैसर्गिक अत्याचार, अपहरण व पोस्को अन्वये गुन्हा दाखल आहे. तो ३० जुलै २०१६पासून नागपूर मध्यवर्ती कारागृहात न्यायाधीन बंदी म्हणून दाखल होता. मात्र, तेथे गैरवर्तन केल्याने २३ मार्च २०२३ रोजी त्याला अमरावती कारागृहात हलविण्यात आले. येथेदेखील ३० जानेवारी रोजी तो अनियंत्रित झाला. त्यामुळे बॅरेक क्रमांक ६ मधील बंद्यांचाही त्याच्याविरोधात रोष निर्माण झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अर्जुन राजमल्लू हे करत आहेत.

# प्रशासकीयदृष्ट्या बहिरमची यात्रा संपली; पोलिस बंदोबस्त आज हटणार, व्यापारी ८ फेब्रुवारीपर्यंत मुक्कामी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा**

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांच्या सांस्कृतिक व धार्मिक परंपरेचे प्रतीक असलेली बहिरम यात्रा प्रशासकीयदृष्ट्या शुक्रवारी (दि. ३०) संपली. २० डिसेंबरपासून सुरू झालेल्या या यात्रेची अधिकृत मुदत ३० जानेवारीला संपुष्टात आली असली, तरी विदर्भातील सर्वाधिक दिवस चालणाऱ्या या यात्रेत ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजीदेखील भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. त्यामुळे व्यापारी आणि दुकानदारांनी अद्यापही आपली दुकाने हटवलेली नाहीत.प्रशासकीय आदेशानुसार, मुदतीनंतर यात्रास्थळी कोणत्याही सुविधा दिल्या जाणार नसल्याची माहिती यात्रा प्रशासनाने यापूर्वीच व्यापारी व दुकानदारांना दिली होती. त्यानुसार, यात्रा प्रशासनाने आपला गाशा गुंडाळला असून, पोलिस प्रशासनही सोमवारी (दि. २) यात्रास्थळावरून बंदोबस्त हटवणार आहे. मात्र, प्रत्यक्ष यात्रेचा धार्मिक आणि पारंपरिक समारोप ८ फेब्रुवारी रोजी होणार असल्याने व्यापारी व दुकानदार तोपर्यंत यात्रास्थळी थांबणार आहेत.२१ डिसेंबरला विधिवत होमहवन आणि पूजाअर्चनाने या यात्रेचा प्रारंभ झाला होता. परंपरेनुसार, ८ फेब्रुवारी रोजी बहिरमबाबांच्या साक्षीने मंदिरावर पूजाअर्चा करून अंबाडीची भाजी आणि भाकरीचा नैवेद्य अर्पण केल्यानंतर यात्रेचा समारोप होणार आहे. या दिवशी भाविकांची विशेष गर्दी होण्याची शक्यता आहे.यंदा बहिरम यात्रा केवळ प्रत्यक्ष उपस्थितीतच नव्हे, तर समाजमाध्यमांवरही चांगलीच गाजली. बहिरम बाबांचे धार्मिक महत्त्व, गुणविशेष तसेच यात्रेची परंपरा याबाबतचे व्हिडिओ यूट्यूबवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. त्यामुळे नव्या पिढीपर्यंतही बहिरम यात्रेची ओळख पोहोचल्याचे दिसून येते.



यात्रेदरम्यान भक्तांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गर्दी राहिली. काही वेळा ही गर्दी लक्षवेधक ठरली. जेवणावळींनाही विशेष उधाण आले. गोवरीच्या भाजणीतील रोडगे, आलू–वांग्याची भाजी, तुरीच्या डाळीचे वरण यांचा आस्वाद घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली. विशेषतः बहिरमच्या हंडीतील भाजीने यंदा सर्व विक्रम मोडले. महाराष्ट्रासह लगतच्या राज्यांतील शौकिनांनी हंडीतील भाजीसाठी आवर्जून हजेरी लावली.बहिरमची हंडी हा आता एक 'ब्रँड' ठरत असून, विदर्भातील अनेक शहरांमधील हॉटेल्समध्येही हा ब्रँड पाहायला मिळत आहे. त्यामुळे बहिरम यात्रेचे धार्मिकच नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधिक ठळकपणे समोर आले आहे.

# अजितदादांचा १०० टक्के घातपात झाला अमोल मिटकरींचा गंभीर आरोप

## देव माणूस हिरावून नेण्याचे पाप करणाऱ्यांची चिता जाळणारा कुणी शिल्लक नसेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अकोला**

बारामती विमानतळावर धुकं नव्हे तर धोका होता. अजितदादा पवार यांचा १०० टक्के घातपातच झाला आहे, असा गंभीर आरोप राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी केला. अजितदादा सारखा देव माणूस हिरावून नेण्याचे पाप करणाऱ्यांची चिता जाळण्यासाठी देखील त्यांच्या घरात कोणी शिल्लक राहणार नाही, अशी उद्विग्न भावनाही मिटकरी यांनी व्यक्त केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत २८ जानेवारीला निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या सर्व घटनेवर आमदार अमोल मिटकरी यांनी संशय व्यक्त करीत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. माध्यमांशी बोलताना त्यांनी घातपाताचा दावा केला.

अमोल मिटकरी म्हणाले, अजितदादा यांच्या विमान अपघातावेळी बारामती विमानतळावर धुके नव्हते तर धोका होता. त्यामुळे अजित दादांचा १०० टक्के घात झाल्याचे स्पष्ट होते. जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत लढा देणार आणि सर्व सत्य जनतेसमोर आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे.



माझे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले. अजितदादानंतर त्यांच्या कुटुंबीयांसाठी जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेणार आहे. यासंदर्भात 'मे' महिन्यात भूमिका जाहीर करू.

माझा विश्वास आहे आणि माझ मन सांगते दादा असे जाऊच शकत नाहीत. ज्यांनी कुणी हा देव माणूस हिरावून नेण्याचे पाप केले असेल भविष्यात त्यांच्या घरात त्यांची चिता जाळणारा कुणी शिल्लक नसेल, अशी भावना देखील मिटकरी यांनी व्यक्त केली.

**अनेक प्रश्नांमुळे संशयाचे धुके**

प्रवासी यादी नोंदवलेली असते, मग विसंगती का? एखादाही कागदाचा तुकडा जळालेला का दिसत नाही? एवढ्या वेळा पायलट का बदलले गेले? विमानाची निवड कोणी व कोणत्या निकषांवर केली? अतिमहत्त्वाच्या व्यक्तीसाठी अपघात व सुरक्षा दोषांचा इतिहास असलेल्या ङशरीक्षशीं ४५ विमानाची निवड कोणी व कोणत्या निकषांवर केली? अहवालांनुसार पूर्वी अल्कोहोल संबंधित कारणांवर शासकीय कारवाई व निलंबनाची नोंद असलेल्या पायलट सुमित कपूर यांची ऐनवेळी नियुक्ती कोणाच्या निर्णयाने आणि कोणत्या मेडिकल, फिटनेस, सेफ्टी क्लिअरन्सवर करण्यात आली? याबाबत सविस्तर तांत्रिक स्पष्टीकरण काय? असे अनेक प्रश्न अमोल मिटकरी यांनी उपस्थित केले आहेत. या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी होत आहे.

# दिवंगत लोकनेता अजितदादांचा अस्थीकलश अमरावतीत....




**दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांचा अस्थिकलश घेऊन आ.संजय खोडके अमरावती येथे पोहोचले.अमरावती जिल्ह्यासाठी अजितदादा पवार यांचा अस्थिकलश आमदार - सुलभाताई खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी परिवार,सर्वपक्षीय कार्यकर्ते तसेच सर्व जनतेला दर्शनासाठी खुला राहणार आहे.**

# पाचशे पर्यटकाचा भार सांभाळणार स्काय वॉक

## स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणून चिखलदरा प्रसिद्ध आहे. येथील निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी देशभरातून पर्यटक येत असतात. आता या पर्यटनात 'स्काय वॉक'ची भर पडणार आहे. निसर्गाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी खोल दरीतूच चालण्याचा आणि हवेतून झेपावण्याचा आनंद पर्यटकांना काही दिवसांत घेणार आहे. या ठिकाणी भारतातील सर्वात लांबीचा काचेचा पूल (स्काय वॉक) उभारला जात आहे. या पुलाच्या 'डेक'चे काम पूर्ण झाले आहे. पुढील महिन्यात या स्काय वॉकचे लोकार्पण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



स्काय वॉकची उंची २८० मीटर (अंदाचे ५९४ फूट) आहे. या स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे असणार आहे. एकाचवेळी ५०० पर्यटकांचा भार सांभाळण्याची तसेच प्रतितास १९० किलोमीटर गतीचा वारा झेलण्याची क्षमता या काचेची राहणार आहे. हरिकेन आणि गोराघाट यादरम्यान सर्वसाधारण वाऱ्याचा वेग ताशी १६० किलोमीटर असतो. या प्रकल्पावर सुमारे ४० कोटी रुपये खर्च होत आहेत. इंदूर येथील ॲपिकॉन कंस्ट्रक्शन कंपनीला या कामाचे कंत्राट देण्यात आले आहे. या स्काय वॉकच्या ४० मीटर उंचीच्या पिलरच्या कामाला फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरुवात होऊन प्रकल्प फेब्रुवारी २०२१ मध्ये पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते.

मात्र, सिडकोने आवश्यक त्या परवानग्या न घेताच काम सुरू केल्यामुळे परवानगीच्या फेऱ्यात हा महत्त्वपूर्ण प्रकल्प अडकला होता. वन मंत्रालयाने घालून दिलेल्या अटी आणि शर्तींची पूर्तता केल्यानंतर या प्रकल्पाच्या कामाला पुन्हा सुरूवात झाली. आता या पुलाच्या 'डेक'चे काम पूर्ण झाले आहे. आता काच लावणे व इतर किरकोळ कामे केली जाणार आहेत. त्यासाठी काही कालावधी लागू शकतो. मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले असून त्या पद्धतीने कंत्राटदार कामाला गती देत असल्याचे दिसून येत आहे.

चिखलदरा येथे जंगल सफारी व व्याघ्र प्रकल्प असल्यामुळे देशभरातून पर्यटकांची पहिली पसंती चिखलदरा आहे. कॉफीच्या बागा, प्रसन्न वातावरण, पशु-पक्षांच्या शेकडो प्रजाती, डोंगर दऱ्यांच्या या परिसरात निसर्गाच्या सानिध्यात रममाण होण्याची प्रत्येकाचीच इच्छा असते.

चिखलदरा येथे स्काय वॉकचे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळू शकेल. स्काय वॉक हे चिखलदरासाठी एक महत्वाचे केंद्र ठरणार असून पर्यटकांचा ओघ वाढेल, असे चिखलदरा हॉटेल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीवर्धन करंडे यांनी सांगितले.

# बोगस दिव्यांगांचा प्रवास थांबणार

## धावत्या एसटीतच होणार यूडीआयडीची रिअल टाइम तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

एसटी महामंडळाच्या बसमधून सवलतीचा लाभ घेण्यासाठी बनावट दिव्यांग ओळखपत्रांचा (यूडीआयडी) वापर करणाऱ्यांना आता चांगलाच चाप बसणार आहे.



बोगस ओळखपत्रांबाबत वाढलेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत प्रशासनाने 'ऑन द स्पॉट' तपासणी मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. आता वाहक व तपासणी पथके धावत्या बसमध्येच मोबाइल ॲपच्या माध्यमातून यूडीआयडी कार्डची रिअल टाइम पडताळणी करणार आहेत.राज्य सरकार व एसटी महामंडळातर्फे दिव्यांग प्रवाशांना तिकीट दरात मोठी सवलत दिली जाते. मात्र काही जण झेरॉक्स, बनावट क्यूआर कोड किंवा खोट्या कागदपत्रांच्या आधारे यूडीआयडी कार्ड मिळवून या सुविधेचा गैरफायदा घेत असल्याचे समोर आले आहे. यामुळे खऱ्या दिव्यांग प्रवाशांचे नुकसान होत आहे.कर्मचाऱ्यांच्या मोबाइलमध्ये विशेष यूडीआयडी ॲप डाऊनलोड करण्यात आले असून, कार्डवरील क्रमांक टाकताच संबंधित व्यक्तीची संपूर्ण माहिती स्क्रीनवर दिसणार आहे. माहिती जुळली नाही तर ते कार्ड जागीच जप्त करण्यात येणार असून संबंधितावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाणार आहे. जप्त केलेली बनावट ओळखपत्रे मध्यवर्ती कार्यालयात जमा करून त्यांची नोंद ठेवली जाणार आहे. त्यामुळे भविष्यात पुन्हा गैरप्रकार करण्यास आळा बसणार आहे.

# सव्वा-सव्वा वर्षांचा उपमहापौर फॉर्म्युला; सचिन भेंडे व अजय जयस्वाल यांना संधी

## युवा स्वाभिमान पक्षाचा सर्वानुमते निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

अमरावती महानगरपालिकेत आमदार रवी राणा यांच्या नेतृत्वाखाली युवा स्वाभिमान पक्षाने मोठे यश मिळवत १५ नगरसेवक भरघोस मतांनी निवडून आणले आहेत. या बळावर येत्या ६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापौर-उपमहापौर निवडणुकीत पक्षाला उपमहापौर पदाची संधी मिळाली असून, पक्षाने सर्वानुमते सव्वा-सव्वा वर्षांचा उपमहापौर फॉर्म्युला निश्चित केला आहे.या निर्णयानुसार साईनगर प्रभागातून विक्रमी मताधिक्याने निवडून आलेले नगरसेवक सचिन भेंडे हे पहिल्या सव्वा वर्षासाठी उपमहापौरपदाची धुरा सांभाळतील, तर बडनेरा येथील नवीवस्ती प्रभागातून निवडून आलेले अजय जयस्वाल हे उर्वरित सव्वा वर्षासाठी उपमहापौर होतील. पक्षाच्या या निर्णयामुळे दोन्ही प्रभागांना न्याय मिळाला असून, संघटनात्मक समन्वयाचे उत्तम उदाहरण घडले आहे.या फॉर्म्युल्यामुळे बडनेराला प्रथमच उपमहापौरपदाचा मान मिळणार असून, आमदार रवी राणा यांची बडनेरा परिसराविषयी असलेली आपुलकी, तळमळ आणि विकासाबाबतची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी युवक नेतृत्वाला संधी देण्याची भूमिका युवा स्वाभिमान पक्षाने घेतल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.महानगरपालिकेतील आगामी कार्यकाळात नागरिकांच्या मूलभूत समस्या, विकासकामे आणि पारदर्शक प्रशासनाला प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे. उपमहापौरपदाच्या या निर्णयामुळे शहराच्या राजकारणात युवा स्वाभिमान पक्षाचे वजन अधिक भक्कम झाल्याचे चित्र आहे.

# विद्यार्थ्यांना 'तमन्ना' करिअरचा मार्ग दाखवणार

## एनसीईआरटीचा मोठा निर्णय, ९ वी ते १२ वींसाठी ऑनलाइन ॲप्टिट्यूड टेस्ट

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

दहावी-बारावी झाल्यानंतर पुढे काय करायचे, हा प्रश्न आजही अनेक विद्यार्थी आणि पालकांना भेडसावतो. अनेकदा मित्रांचे अनुकरण, समाजातील दबाव किंवा पालकांच्या अपेक्षांमुळे करिअरची निवड केली जाते आणि नंतर पश्चात्तापाची वेळ येते. हीच अडचण दूर करण्यासाठी एनसीईआरटी आणि 'अंतरंग फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'तमन्ना'ही ऑनलाइन अभिक्षमता चाचणी विकसित करण्यात आली आहे. या चाचणीमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांची, नैसर्गिक आवडीची आणि क्षमतेची अचूक ओळख



पटणार आहे.शालेय शिक्षण विभागाने या पथदर्शी प्रकल्पाला हिरवा कंदील दिला असून, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक अशा एकूण १४ ते १५ नामांकित शाळांची निवड 'समुपदेशन केंद्र' म्हणून करण्यात आली आहे. या केंद्रांवर संगणक व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, मार्गदर्शनाखाली ही चाचणी घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.'तमन्ना' अभिक्षमता चाचणी ही वैज्ञानिक पद्धतीने तयार करण्यात आली आहे. विद्यार्थी तांत्रिक, वैद्यकीय, कला, वाणिज्य, व्यवस्थापन की इतर कोणत्या क्षेत्राकडे अधिक झुकाव ठेवतो, हे या चाचणीतून स्पष्ट होणार आहे. करिअर निवडीसाठी ९ वी ते १२ वी हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. याच वयात योग्य मार्गदर्शन मिळाल्यास पुढील आयुष्यातील अनेक अडथळे टाळता येतात.या चाचणीत भाषिक तार्किक, संख्यात्मक, अवकाशीय , यांत्रिक यांसह एकूण सात विविध क्षमतांची पडताळणी केली जाणार आहे. विशेष म्हणजे, ही परीक्षा गुणांवर आधारित नसून विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक विचारसरणी, निर्णयक्षमता आणि आवड यांवर आधारित आहे. त्यामुळे पास-नापास असा कोणताही निकाल नसून, विद्यार्थ्याला स्वतःबद्दल समजून घेण्याची संधी मिळणार आहे.ही चाचणी अत्यंत सोपी व वेगवान असून, केवळ १० मिनिटांत ३० बहुपर्यायी प्रश्न सोडवावे लागणार आहेत. कमी वेळेत विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आणि निर्णय घेण्याची पद्धत तपासली जाणार आहे.बहुतेक वेळा मुले पालकांच्या दबावाखाली करिअर निवडतात. 'तमन्ना' चाचणीमुळे वैज्ञानिक अहवालाच्या आधारे योग्य दिशा मिळेल. पालकांनी आपल्या पाल्यांना या चाचणीत सहभागी होऊ द्यावे, असे आवाहन डॉ. विनीत मते, प्राचार्य, चंद्रपूर यांनी केले आहे.या उपक्रमामुळे 'शिकून काय बनायचे' याचा निर्णय गुणांवर नव्हे, तर सुप्त गुण आणि आवडीनुसार घेता येणार असून, विद्यार्थ्यांचा करिअर प्रवास अधिक निश्चित व आत्मविश्वासपूर्ण होणार आहे.

# हंगामाच्या सुरुवातीलाच तूर-सोयाबीनचे दर तेजीत शेतकऱ्यांना दिलासा, पण फायदा कुणाला?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

यावर्षी खरीप हंगामाच्या प्रारंभालाच तूर आणि सोयाबीनच्या दरांनी चांगलीच उसळी घेतली आहे. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत सोमवारी तुरीला अधिकतम ९,१५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. यंदा तुरीचा हमीभाव ८,००० रुपये असताना बाजारभाव तब्बल हजार रुपयांनी जास्त असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे. त्याचप्रमाणे सोयाबीनलाही अपेक्षेपेक्षा जास्त दर मिळत असून, ५,३२८ रुपये हमीभाव असताना बाजारात ५,५७१ रुपये प्रतिक्विंटल दर नोंदवला गेला.कृषी तज्ज्ञांच्या मते, या दरवाढीमागे स्थानिकच नव्हे तर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय घटक कारणीभूत आहेत. यावर्षी मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाची अनियमितता राहिली. काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही भागांत पावसाच्या खंडामुळे तुरीच्या पिकाचे नुकसान झाले. याशिवाय, गतवर्षी कमी दरामुळे अनेक शेतकऱ्यांनी तुरीचे क्षेत्र कमी केल्याने यंदा उत्पादन घटले असून बाजारात आवक मर्यादित आहे.दुसरीकडे, डाळ उद्योगांकडून



तुरीची मागणी सातत्याने वाढत आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर खरेदीत वाढ झाल्याने बाजारात स्पर्धा वाढली आणि दर चढले. मात्र, हंगामाच्या सुरुवातीलाच अनेक शेतकऱ्यांकडे माल कमी असल्याने या दरवाढीचा प्रत्यक्ष फायदा व्यापाऱ्यांनाच होणार की शेतकऱ्यांना, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**आफ्रिकन देशांत तुरीच्या उत्पन्नात घट**

देशातील बाजारात तूर आयातीसाठी आफ्रिकन देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. यावर्षी म्यानमार, टांझानिया आणि मोझांबिकमध्ये तुरीच्या उत्पादनात बरीच घट झाल्याने देशाबाहेरून होत असलेली आयात मर्यादित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवाय स्वस्त आयातीची शक्यता कमी आहे. यासोबतच कर्नाटक, मराठवाडा भागात तुरीच्या सरासरी उत्पन्नात कमी आल्याने दरावर परिणाम झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# तृतीयपंथीयांना स्वतंत्र ओळख देण्यासाठी शासनाचे नवे धोरण; योजनांचा लाभ थेट मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

तृतीयपंथीयांना स्वतंत्र व अधिकृत ओळख नसल्याने त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांचा अभाव राहतो. परिणामी, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभापासून हा घटक आजवर वंचित राहिला आहे. ही बाब लक्षात घेऊन तृतीयपंथीयांना स्वतःची अधिकृत ओळख मिळावी, यासाठी शासनाने नवे धोरण हाती घेतले आहे. अमरावती जिल्ह्यात शासनदफ्तरी निवडक तृतीयपंथीयांची नोंद असली, तरी प्रत्यक्षात ही संख्या अधिक असल्याचे वास्तव आहे.शासनाच्या योजना प्रत्येकासाठी असून, त्यांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, हे शासनाचे धोरण आहे. मात्र, विविध कारणांमुळे तृतीयपंथीय आजही योजनांपासून दूर राहिले आहेत. तृतीयपंथीयांचे हक्क व अधिकार सुरक्षित करण्याच्या दृष्टीने 'नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर पर्सन्स' या केंद्र शासनाच्या पोर्टलवर त्यांची नोंदणी केली जात आहे. ही जबाबदारी प्रत्येक जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाकडे सोपविण्यात आली आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर तृतीयपंथीयांना अधिकृत ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.नोंदणीसाठी मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, रेशन कार्ड व निवासाचा दाखला ही कागदपत्रे आवश्यक असून, याबाबतची सविस्तर माहिती संबंधित समाजकल्याण कार्यालयात उपलब्ध आहे.

# एकाच वर्षात पाचव्यांदा नियम मोडल्यास वाहन नोंदणी रद्द; चालकाचा परवानाही जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

शहरात वाढते रस्ते अपघात, बेशिस्त वाहनचालक आणि त्यामुळे जाणारे निष्पाप जीव रोखण्यासाठी केंद्र सरकारने आतापर्यंतचे सर्वांत कठोर पाऊल उचलले आहे. केंद्रीय मोटार वाहन कायदा १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून, वारंवार वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांवर आता थेट कठोर कारवाई केली जाणार आहे. नव्या नियमानुसार, एका वर्षात पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित वाहनाची नोंदणी (रजिस्ट्रेशन) रद्द करण्यात येणार असून, चालकाचा ड्रायव्हिंग लायसन्सही कायमस्वरूपी रद्द केला जाणार आहे.शहरातील वाढती वाहतूक, बेदरकार वाहनचालक, वेगमर्यादेचे उल्लंघन, सिग्नल तोडणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे अशा घटनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. यावर आळा



घालण्यासाठी केंद्र सरकारने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यामुळे 'रिपीट ऑफेंडर्स' म्हणजेच वारंवार नियम मोडणाऱ्या चालकांना चांगलाच चाप बसणार आहे.मागील एक वर्षात अमरावती जिल्ह्यात हजारो चालकांनी वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याची नोंद आहे. या चालकांमुळेच अपघातांची तीव्रता आणि संख्या वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नव्या कायद्यामुळे अशा वाहनचालकांवर नियंत्रण मिळण्याची शक्यता आहे.आतापर्यंत अनेक चालक वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करत होते. मात्र, आता किरकोळ वाटणारी चूकही भविष्यात मोठ्या कारवाईस कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे चांगलेच महागात पडणार आहे. रस्त्यावर वाहन चालवताना शिस्त पाळणे हे केवळ कर्तव्य नसून काळाची गरज आहे. यासाठी वाहतूक विभागाकडून नव्या मोटार वाहन कायद्याबाबत जनजागृतीही केली जात आहे.महत्त्वाचे म्हणजे, कारवाई करण्यापूर्वी वाहनचालकाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाणार आहे. संबंधित कारवाई चुकीची वाटल्यास चालक किंवा वाहनमालक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील करू शकणार आहे. मात्र, सीसीटीव्ही फुटेज किंवा डिजिटल पुराव्यांमधून नियम मोडल्याचे स्पष्ट झाल्यास कोणतीही शिफारस किंवा विनंती ग्राह्य धरली जाणार नाही. अशा परिस्थितीत विहित दंड आणि कठोर कारवाई अटळ असेल.केंद्र सरकारने मूळ मोटार वाहन कायद्यात सुधारणा करून प्रशासनाला अधिक अधिकार दिले आहेत. अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि रस्ते सुरक्षा मजबूत करणे हा या बदलांचा मुख्य उद्देश आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यानंतर दंड भरण्यासाठी ४५ दिवसांचा 'ग्रेस पीरियड' देण्यात येणार असून, या कालावधीत दंड भरल्यास कायदेशीर गुंतागुंत टाळता येणार आहे.नव्या नियमांमुळे वाहनचालकांनी अधिक जबाबदारीने वाहन चालवावे, हाच केंद्र सरकारचा स्पष्ट संदेश आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत